CCTV CAMERA
बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १२.०८.२०२६ | अंक नं. ११४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# शहरातून रोज सर्रास धावतात अवजड वाहने

## जिल्हाधिकाऱ्यांची जड वाहन बंदी नावालाच

नगर – जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश काढून शहरात अवजड वाहनांना प्रवेश करण्यास सक्त मनाई केलेली आहे. असे असतानाही शहर वाहतूक शाखेच्या डोळ्यांसमोरुन अवजड वाहने शहरात प्रवेश करतात. तरीदेखील या अवजड वाहनांना अडविले जात नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी लागू केलेली अवजड वाहन प्रवेश बंदी केवळ नावालाच आहे का, असा प्रश्न शहरातील नागरिक उपस्थित करीत आहेत.

१२ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास पत्रकार चौक येथून एक अवजड वाहन शहरात घुसले. विशेष म्हणजे पत्रकार चौकातच शहर वाहतूक शाखेचे कार्यालय आहे. एमआयडीसीकडून येणारी सर्व वाहने शहर पोलीस चौकीसमोरुन नगर शहरात प्रवेश करतात. मात्र, कोणीही या वाहनांना अडवित नाही. भरधाव वेगाने ही वाहने शहरात घुसतात. या अवजड वाहनांना पाहूनही शहर वाहतूक शाखेची होणारी डोळेझाक नागरिकांच्या मनात संशय निर्माण करणारी ठरत आहे. एमआयडीसीत अनेक कंपन्यांची गोडावून आहेत. या गोडावूनमधील माल मोठ्या वाहनांमधूनच शहरात आणला जातो. जिल्हाधिकाऱ्यांनी मनाई आदेश काढताना मालवाहू वाहने रात्री १० वाजेनंतर सकाळी ६ वाजेपर्यंतच शहरात आणावीत, असे निर्देश दिलेले आहेत. मात्र, याकडे कानाडोळा करीत ही अवजड वाहने सर्रास शहरात घुसतात. माल खाली करतात आणि पुन्हा निघून जातात. मात्र, या वाहनांवर कोणतीही यंत्रणा कारवाई करण्यास धजावत नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी लागू केलेली अवजड वाहन प्रवेश बंदीच्या आदेशालाच शहर वाहतूक शाखेने केराची टोपली दाखविली की काय, असा सवाल आता शहरातील नागरिक उपस्थित करु लागले आहेत.



शहरात जड वाहनांना प्रवास बंदी असताना १२ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास हे अवजड वाहन पत्रकार चौकाकडून दिल्ली गेटमार्गे भरधाव वेगात गेले. (छाया – धनेश कटारिया)

१२ ऑगस्ट रोजी एक कार्गो वाहन भरधाव वेगाने शहरात घुसले. विशेष म्हणजे पत्रकार चौक ते नेप्तीनाका या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. याच रस्त्यावर शाळा, महाविद्यालय देखील आहे. सकाळच्या वेळेत महाविद्यालयात, शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांचीही लगबग असते. अशा वेळेत हे वाहन भरधाव वेगाने गेले. विशेष म्हणजे पत्रकार चौकापासून पुढे प्रत्येक चौकात पोलीस असतात. तरीदेखील या वाहनाला कोणीही हटकले नाही. सुसाट वेगाने हे वाहन जात असताना एकाही वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्याने हे वाहन अडविले नाही. दिल्ली गेट येथील वर्दळीतून संबंधित वाहन वेगाने नेप्तीनाकाच्या दिशेने गेले.

अनेकदा वाहतूक शाखेचे कर्मचारी छोट्या वाहनांना अडवून त्यांच्याकडून दंड वसूल करतात. वाहनावर कायदेशीर कारवाईदेखील केली जाते. मात्र, अशा मोठ्या वाहनांना खुलेआम शहरात का सोडले जाते, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### डाळ मंडईत मुजोर वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई

शहरातील डाळ मंडई व आडते बाजार परिसरात रस्त्याच्या मधोमध वाहने उभी करून वाहतुकीचा खोळंबा करणाऱ्या मुजोर वाहनचालकांविरोधात वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी कारवाई करीत काही वाहने ताब्यात घेतली तर काही काही वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. पाटील यांनी स्वतः रस्त्यावर उतरुन वाकड्या-तिकड्या पद्धतीने उभी केलेली वाहने हटविली.

कोट्यवधींची उलाढाल असलेल्या या बाजारपेठेत अवजड वाहने व टेम्पो अस्ताव्यस्त उभे राहत असल्याने तासन्‌तास वाहतूक कोंडी होत होती. ग्राहक, व्यापारी आणि नागरिकांना अक्षरशः कोंडीतून वाट काढावी लागत होती. या गंभीर प्रकाराची दखल घेत महेश पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कारवाईचा बडगा उगारला. रस्ते अडवून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. कारवाईनंतर बाजारपेठेतील वाहतूक सुरळीत होत असल्याने व्यापारी व नागरिकांनी समाधान व्यक्त केले. (संबंधित छायाचित्र पान २ वर...)

पुण्यातील फुफ्फुस तज्ञ, अहिल्यानगर मध्ये
मोफत तपासणी शिबीर
खालील लक्षणे असलेल्या व्यक्तीने जरूर तपासणी करणे
* हवामानामध्ये बदल झाल्यास शिंका येतात का?
* धुळीच्या संपर्कात आल्यावर खोकला येतो का?
* सकाळी उठल्यावर कफ पडतो का?
* तुमच्या छातीतून घरघर आवाज येतो का?
* चालल्यावर किंवा जिना चढल्यावर दम लागतो का?
* तुमचा खोकला रात्री व पहाटे अधिक तीव्र असतो का?
* कोरडा किंवा लवकर बरा न होणारा खोकला यामुळे त्रस्त आहात का?
डॉ. हर्षल जे. गांधी
पी.एफ.टी. मोफत तपासणी | सर्व रक्त तपासणीवर 50% सुट | गरजु रुग्णांना एक्स-रे रु. 150/- फक्त
GURUDEV
गुरुदेव स्पेशालिटी क्लिनिक आणि ऑर्थो केअर
अपॉईंटमेंट साठी कॉल करा 9112108108

बजाज वॉटरप्रूफिंग कंपनी
५ वर्षांच्या लेखी गॅरंटी सह
तोडफोड न करता केमिकल वॉटरप्रूफिंग
टेरेस, बाल्कनी, पाण्याचे हौद इ.
9096291653

जय आनंद! जय जिनेन्द्र! जय महावीर!
महाराष्ट्र प्रवर्तक प.पू. कुंदनऋषीजी म.सा. तथा उपाध्याय प्रवर प्रवीणऋषीजी म. सा. आदी ठाणा इनकी प्रेरणा से, गुरुदेव
प. पू. आचार्य आनंदऋषीजी म.सा. के
१२७ वी जन्म जयंती
के उपलक्ष में
127 उपवास कि देसरडा परिवार कि ओरसे गुरु चरणो में भेट.
समर्पण चातुर्मास — समर्पण-सर्व कल्याण
तप आराधक

| | | | |
|---|---|---|---|
| CA संदीप मदनलाल देसरडा | 30 उपवास | CA रुपेश राजेंद्र देसरडा | 8 उपवास |
| सौ. शोभा राजेंद्र देसरडा | 9 उपवास | सौ. पूजा रुपेश देसरडा | 8 उपवास |
| श्री. सचिन मदनलाल देसरडा | 9 उपवास | कु. कृपा सागर देसरडा | 3 उपवास |
| सौ. दिपाली सचिन देसरडा | 9 उपवास | चि. हार्दिक सचिन देसरडा | 2 उपवास |
| श्री. सागर मदनलाल देसरडा | 9 उपवास | श्री. पियुषजी प्रमोदजी भंडारी | 9 उपवास |
| चि. श्रेयस सचिन देसरडा | 9 उपवास | सौ. सारिका पियुषजी भंडारी | 9 उपवास |
| कु. सिध्दी संदीप देसरडा | 9 उपवास | श्री. प्रतीक जवाहरलालजी रुप्पवाल | 9 उपवास |
| कु. युक्ती सागर देसरडा | 9 उपवास | सौ. अश्विनी प्रतीक रुप्पवाल | 9 उपवास |
| कु. तनिष्का संदीप देसरडा | 9 उपवास | चि. देवांश पियुषजी भंडारी | 5 उपवास |
| कु. कृती सागर देसरडा | 9 उपवास | | |

आचार्य श्री के जन्मदिन पर कोटी कोटी वंदना ! २४ तीर्थंकर भगवान के विचार एवं वचनोंका प्रचार करनेवाले सभी संप्रदायके साधु-संतोंके चरणों में कोटी कोटी वंदना !
इस ऐतिहासिक चार्तुमास कालमें आचार्य श्री के जन्मदिनपर तपश्चर्या करनेवाले सभी तपस्वीयों का अभिनंदन तथा अनुमोदना ! हर्ष.. हर्ष.. जय जय..
24 तीर्थंकर भगवान के पावन स्मरण के साथ, तपस्या के पथ पर बढ़ते आपके हर कदम को नमन। आपकी कठिन साधना और त्याग को शत-शत वंदन, आपकी पावन तपस्या की हृदय से अनुमोदना!
राजेंद्र चोपडा - सौ. नंदिनी चोपडा
अमित चोपडा - सौ. श्वेता चोपडा
आरव, अर्जुन चोपडा एवम् चोपडा परिवार,
चोपडा मोटर्स अँण्ड कन्स्ट्रक्शन्स्
अहिल्यानगर- पुणे

महाराष्ट्र प्रवर्तक
प. पू. श्री कुंदनऋषिजी म.सा.
इनके सान्निध्य में
अर्हम् विज्जा प्रणेता उपाध्याय
प. पू. श्री प्रवीणऋषिजी म. सा.
आदि ठाणा - 4
समर्पण चातुर्मास — समर्पण-सर्व कल्याण
गुरु भक्ति का पावन महापर्व एवं 3600+ अट्ठाई प्रत्याख्यान...
गुरु गुणानुवाद एवं
श्री गुरु आनंद जन्मोत्सव
गुरुवार, 13 अगस्त 2026 | सुबह 7.30 बजे
गुरु चरणों में भक्ति समर्पित करें और मंगल आशीर्वाद प्राप्त करें!
- आशीर्वाद उपस्थिति -
पु. मुनीश्री हितप्रेम विजयजी महाराज
आदि ठाणा २
- प्रमुख उपस्थिति -
मा. अमृताजी फडणवीस
सामाजिक कार्यकर्त्या, गायिका
सभी के लिए नवकारशी/भोजन व्यवस्था सुबह १०.०० बजे से
चातुर्मास प्रमुख लाभार्थी
श्री. सौरभ प्रमिलाताई हेमराजजी बोरा
सौ. राखी, तनिष, तनय, अरिहंत, श्री. पराग, सौ. सोनम, आरव, श्रेया एवं बोरा परिवार
PMT MACHINES LIMITED
स्थान: आनंद तीर्थ समवशरण, N.N. सथ्था कॉलेज परिसर, आनंदधाम, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# ढंपरचे टायर फुटल्याच्या रागातून चालकाला बेल्ट अन् दांडक्याने मारहाण; गुन्हा दाखल

नगर -चालवत असलेल्या ढंपरचे अचानक तीन टायर फुटल्याची माहिती मालकाला देणे एका चालकाला भलतेच महाग पडले आहे. 'तू मुद्दामून गाडीचे टायर फोडतोस' असा आरोप करत क्रशर प्लांट मालकाने घटनास्थळी येऊन चालकाला बेल्ट आणि लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना भोरवाडी परिसरात घडली आहे.

या प्रकरणी पीडित चालक सागर देविदास शिंदे (वय ३०, रा. एकनाथ नगर, केडगाव, अहिल्यानगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून क्रशर प्लांट मालक भाऊ शेटे (रा. शेटे मळा, लिंक रोड, केडगाव, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सागर शिंदे हे मालवाहू ढंपर घेऊन भोरवाडी येथील भाऊ शेटे यांच्या क्रशर प्लांटजवळून जात असताना गाडीचे तीन टायर अचानक फुटले. याबाबत सागर यांनी मालक भाऊ शेटे यांना फोन करून माहिती दिली. मात्र, शेटे याने फोनवरच शिवीगाळ करत 'तू मुद्दाम टायर फोडतोस' असा संताप व्यक्त केला. सागर यांनी 'मी मुद्दाम टायर फोडले नाहीत' असे स्पष्ट सांगताच, शेटेने 'तू तिथेच थांब, मी लगेच येतो' असे सांगून घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोहोचताच शेटे याने काहीही न विचारता कमरेचा बेल्ट काढून सागर शिंदे यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच तिथेच पडलेल्या लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यांना जखमी केले. तक्रार दिल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवून जीवे मारण्याची धमकीही त्याने दिली. या घटनेनंतर जखमी सागर शिंदे यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नगर तालुका पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला असून तपास पोलीस हवालदार निपसे करत आहेत.

# मनपा कर्मचारी धीरज परदेशी खून प्रकरणाचा तपास तातडीने मार्गी लावून गुन्हेगारांना कडक शासन करा

## राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन



राष्ट्रवादी महिला काँग्रेसने दिलेले निवेदन स्विकारताना अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे. (छाया - लहू दळवी)

नगर - अहिल्यानगर शहरातील महानगरपालिका कंत्राटी कर्मचारी स्वर्गीय धीरज परदेशी यांच्यावर काही गुंडांकडून प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धीरज परदेशी यांचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास तातडीने पूर्ण करून हल्लेखोर व संबंधित गुन्हेगारांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, जेणेकरून अशा गुन्हेगारी प्रवृत्तींवर कायद्याचा धाक निर्माण होईल आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, अशी मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली.

याबाबत राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्ष रेश्माताई आठरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमका यांना निवेदन देण्यात आले. अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांनी हे निवेदन स्विकारले. आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे, स्वर्गीय धीरज परदेशी हे महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना नागरी सुविधा देण्याचे कर्तव्य बजावत होते. कामावर असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला होणे आणि त्यामध्ये त्यांचा मृत्यू होणे ही अत्यंत गंभीर व दुर्दैवी घटना आहे. या घटनेमुळे मनपा कर्मचारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शहरातील नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

स्वर्गीय धीरज परदेशी यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून होता. त्यांच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे कुटुंबाचा आधारच हरपला असून, त्यांच्या कुटुंबीयांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास कोणत्याही प्रकारचा विलंब न करता तातडीने पूर्ण करावा, सर्व आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि स्वर्गीय धीरज परदेशी यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. काम करणाऱ्या शासकीय व महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही गंभीर झाला आहे. कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्यांवर हल्ले होणार असतील तर नागरिकांना नागरी सुविधा देताना कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून कायद्याचा धाक निर्माण करावा, अशी मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, वैभव ढाकणे, अंजली आव्हाड, सारिका खताडे, शारदा जगदाळे, सुरेखा कडूस, शितल गाडे, लता गायकवाड, ललिता पवार, लतिका पवार, निर्मला जाधव, अलिशा गर्जे, युवराज शिंदे, अक्षय भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

# बोल्हेगाव येथे जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ६ जणांवर गुन्हा दाखल; ७० हजारांचा मुद्देमाल जप्त



बोल्हेगाव येथे जुगार अड्ड्यावर छापा टाकून ६ जणांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर -शहर आणि परिसरात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून बोल्हेगाव परिसरातील जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह मोबाईल फोन असा एकूण ७० हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सहा आरोपींवर जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार शाहीद सलीम शेख यांच्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोल्हेगाव येथील चोभे कॉलनी, गांधीनगर भागात काही जण स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तिरट नावाचा हार-जीतचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी ११ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास घटनास्थळी छापा टाकला.

या कारवाईदरम्यान ६ जण पैसे लावून जुगार खेळताना आणि खेळवताना रंगेहात मिळून आले. पोलीस पथकाने घटनास्थळावरून ११ हजार ८४० रुपये रोख आणि ५९ हजार रुपये किमतीचे सहा मोबाईल फोन असा एकूण ७० हजार ८४० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार चांगदेव आंधळे करत आहेत. शहरात अवैध धंदे चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

# दुकान बंद करण्यास सांगत व्यावसायिक बंधूंना मारहाण

नगर - धीरज परदेशी यांच्या हत्येनंतर १० ऑगस्ट रोजी अहिल्यानगर शहर बंद ठेवण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर दुकान बंद करण्यास सांगत बेकरी व्यावसायिक दोन भावांना शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केल्याची घटना शहरातील बुरूडगाव रोडवरील पॉलिटेक्निक कॉलेजसमोर असलेल्या वर्धमान बेकर्स येथे घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तीन अज्ञात इसमांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सार्थक माणिक गांधी (वय २१, रा. सारसनगर) यांनी फिर्याद दिली आहे. सार्थक गांधी व त्यांचा भाऊ साहिल हे दोघे वर्धमान बेकर्स येथे भागीदारीत व्यवसाय करतात. फिर्यादीनुसार, सोमवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास सार्थक हे दुकानाचे अर्धे शटर खाली घेऊन साफसफाई करीत होते. त्यावेळी त्यांचा भाऊ साहिल दुकानाबाहेर उभा होता. त्याचवेळी दुचाकीवरून तीन अनोळखी इसम दुकानाजवळ आले. त्यांनी साहिलला दुकान आताच्या आत्ता बंद करायचे असे सांगत शिवीगाळ व दमदाटी केली. या तिघांची आरडाओरड ऐकून सार्थक दुकानाबाहेर आले. त्यानंतर तिन्ही इसमांनी कोणतेही कारण नसताना सार्थक व साहिल या दोघांना दमदाटी करून मारहाण केली.

यातील एकाने हातातील लोखंडी कड्याने सार्थक यांच्या तोंडावर वार करून जखमी केले. तसेच संशयित आरोपींनी साहिललाही मारहाण केली. दरम्यान, हल्लेखोरांनी दगड फेकूनही मारहाण केली. मारहाणीनंतर तिन्ही अनोळखी इसम दुचाकीवरून तेथून पसार झाले. घटनेनंतर सार्थक व साहिल हे दोघे कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल झाले आणि त्यांनी तिघांविरूध्द फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्याला ५ हजारांची लाच घेताना पकडले

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

नगर -जामखेड तालुक्यातील जातेगांव येथील ग्रामपंचायत अधिकारी महादेव मल्हारी ढाकणे (वय ५२ वर्षे) यांना ५ हजार रुपयाची लाच स्वीकारताना नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या कारवाईमुळे जामखेड तालुक्यात खळबळ उडाली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांनी ग्राम पंचायत जातेगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी महादेव ढाकणे यांच्याविरुद्ध तक्रार केली होती. तक्रारदाराने ग्रामपंचायत अधिकाऱ्याशी संपर्क साधला असता, ग्रामपंचायतीशी संबंधित काही माहिती मिळविण्यासाठी त्यांनी विनंती केली होती. यावेळी संबंधित अधिकाऱ्याने तक्रारदाराकडे १० हजार रुपयाची लाचेची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे तक्रार केली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर विभागाने सापळा रचला. ११ ऑगस्ट रोजी जामखेड येथील हॉटेल महाभगवती परिसरात लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने ग्रामपंचायत अधिकारी महादेव ढाकणे यांना पकडले. या कारवाईदरम्यान तक्रारदाराकडून ५ हजार रुपयाची लाच स्वीकारल्याचे निष्पन्न झाले. उर्वरित रकमेबाबतही फोनवरून संभाषण झाल्याचे नमूद आहे. या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ मधील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक सविता तांबे पो.कॉ . चंद्रकांत काळे, पो. कॉ. शेखर वाघ, चालक पोलीस हवालदार करांडे यांनी केली.

# सतीश मुळे यांचे अल्पआजाराने निधन



नगर - केडगाव देवी अहिल्यानगर येथील रहिवासी स्व. सतीश श्रीनिवास मुळे (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने ८ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नात, मुलगी, जावई असा परिवार आहे.

ग. ज. चिदांबर (पूर्वीचे कन्या विद्या मंदिर) शाळेत ते ३८ वर्ष वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत होते. त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. समाजामध्ये मनमिळाऊ तसेच कायम मदतीला उभे राहणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख होती.



डाळ मंडई परिसरात बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करताना शहर वाहतूक शाखेचे पोनि. महेश पाटील


# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या राज्यस्तरीय मूल्यमापन समितीवर पद्मश्री पोपटराव पवार यांची निवड



नगर - मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या राज्यस्तरीय मूल्यमापन समितीवर पद्मश्री पोपटराव पवार यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय मूल्यमापनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, सध्या विभागस्तरीय मूल्यमापन सुरू आहे. विभागस्तरावर निवड झालेल्या उत्कृष्ट दोन ग्रामपंचायतींचे राज्यस्तरीय समितीमार्फत प्रत्यक्ष मूल्यमापन करण्यात येणार आहे. या मूल्यमापनातून सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या तीन ग्रामपंचायतींची राज्यस्तरीय अत्युउत्कृष्ट ग्रामपंचायती म्हणून निवड केली जाणार आहे. राज्यस्तरीय मूल्यमापन समितीत संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा), पुणे; मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद); संचालक, पंचायतराज; संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण; बेला ग्रामपंचायत, ता. व जि. भंडारा येथील सरपंच शारदा गायधने; मंत्रालय पत्रकार संघाच्या वतीने नामनिर्देशित एक पत्रकार तसेच ग्रामविकास विभागाचे उपसचिव यांचा समावेश आहे.

# दिनकर करंजुले यांचे दु:खद निधन



नगर - पारनेर तालुक्यातील पाडळी रांजणगाव येथील रहिवाशी कै. दिनकर श्रीराम करंजुले (वय ८७) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्यावर पाडळी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. त्यांच्या निधनाने पाडळीसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# संजय मोरे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील मोरगेवस्ती वॉर्ड नं.७ येथील रहिवासी संजय शिवराम मोरे (वय ५५) यांचे १२ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, तीन मुली, मावस भाऊ, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रभाकर मोरे यांचे धाकटे बंधू तर वायरमन सुरेश सरदार, चंद्रकांत सरदार व मेजर कृष्णा सरदार यांचे मावसभाऊ होत.

# विठ्ठल लोखंडे यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क खात्यातील सेवानिवृत्त जिल्हा अधीक्षक विठ्ठल चंद्रसेन लोखंडे (वय ७२) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

उत्पादन शुल्क खात्यात काम करीत असताना आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला. ज्येष्ठ नागरिक संघ भिंगार येथे ते उपाध्यक्ष पदावर कार्यरत होते तर भिंगार देवांग कोष्टी समाजाचे ते माजी कार्यकारी संचालक होते. त्यांना गायनाची आवड होती. संत तुकडोजी महाराज यांचे अभंग ते नेहमीच मोठ्या भक्तिभावाने गात असत. स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीचे ते पाच वर्ष निमंत्रित सदस्य होते. दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. गरीब गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप तसेच इ.१० व १२ वीच्या विद्यार्थींना परीक्षा फी साठी प्रबोधिनीला आर्थिक मदत करीत असत. याकाळात ज्येष्ठांसाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले. त्यांचे वडील चंद्रसेन लोखंडे हे स्वातंत्र्य सैनिक होते.

# 'इतिहास महाराष्ट्राचा' महाअंतिम फेरीत बालकलाकारांनी जिंकली मने



बालरंगभूमी परिषद आयोजित इतिहास महाराष्ट्राचा महोत्सवातील विजेत्यांसमवेत अ‍ॅड. नीलम शिर्के-सामंत, संजय हळदीकर, प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे, दिगंबर नाईक यांच्यसह पदाधिकारी.

नगर - बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित इतिहास महाराष्ट्राचा या इतिहासातील थोर विभूतीस समर्पित असलेल्या महोत्सवाची महाअंतिम फ ेरी नुकतीच अहिल्यानगरमध्ये उत्साहात झाली. माउली सभागृहात रंगलेल्या या महाअंतिम फेरीत राज्यातून आलेल्या सुमारे ४५० बालकलावंतांनी आपल्या दमदार अभिनयाने उपस्थितांची मने जिंकली. या महोत्सवात सर्वांनी स्वगत, नाट्य, नृत्य, गायन आणि वादनाच्या सादरीकरणातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे प्रेरणादायी जीवनकार्य मांडून त्यांच्या विचारांचा जागर केला.

महोत्सवाच्या महाअंतिम फेरीतील विजेत्यांना प्रसिद्ध अभिनेते व तज्ज्ञ परीक्षक संजय हळदीकर (कोल्हापूर), लोककलेचे अभ्यासक प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे (मुंबई) आणि प्रसिद्ध अभिनेते दिगंबर नाईक (मुंबई) तसेच बालरंगभूमी परिषदेच्या मध्यवर्तीच्या अध्यक्षा अ‍ॅड. नीलम शिर्के-सामंत व उपस्थित पदाधिकाऱ्यांच्या हस्ते रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. मकरंद खेर व शाम शिंदे उपस्थित होते.

अ‍ॅड. नीलम शिर्के-सामंत म्हणाल्या, बालकलाकारांनी खूप मेहनत घेऊन उत्तुंग प्रगती करत अभिनय क्षेत्रात यशस्वी होऊन एकदिवसीय स्टेजवरील प्रमुख पाहुण्यांची खुर्ची मिळवावी. अहिल्यानगरमध्ये झालेला इतिहास महाराष्ट्राचा महोत्सव अतिशय उत्कृष्ट व नियोजनबद्धरित्या यशस्वी झाला आहे. नगरमध्ये आल्यावर येथील माजी अध्यक्षा स्व. उर्मिला लोटके यांची उणीव भासली. आज जरी त्या नसल्या तरी नगर शाखेने त्यांना अभिप्रेत होईल, असे उत्कृष्ट नियोजन या सोहळ्याचे केले.

यावेळी परिक्षकांनी मनोगतातून विविध सूचना करून सहभागी बालकांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. लोककलेचे अभ्यासक प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे यांनी आपल्या पहाडी आवाजात काही लोकगीतांचे सादरीकरण केले. त्यांना प्रेक्षकांनी टाळ्या व शिट्यांनी दाद दिली.

पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रास्ताविकात अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी स्पर्धेचा आढावा घेत नगरला संधी दिल्याबद्दल आभार मानले. देवीप्रसाद सोहनी यांनी सूत्रसंचालन केले. अनंत जोशी यांनी आभार मानले. यावेळी अ.भा.मराठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, बालरंगभूमी परिषदेचे कार्यवाह योगेश शुक्ल, उपाध्यक्षा दीपा क्षीरसागर, शैलेश गोजमगुंडे, अहिल्यानगर शाखेचे प्रमुख कार्यवाह शैलेश देशमुख, सुजाता पायमोडे, श्रीया देशमुख, टीना इंगळे, सोनाली दरेकर, तेजा पाठक, तेजस अतीतकर, सपना साळुंके, सागर अलचट्टी, विराज अरगटला, प्रशांत सूर्यवंशी, ऋतुजा पाठक, अविनाश बोधले आदी उपस्थित होते.

स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे - लहान गट (वय वर्षे ५ ते १०) सर्वोत्कृष्ट: सिध्दी पाटील (बीड), उत्कृष्ट: स्पृहा जाधव (बृहन्मुंबई), उत्तम: जिगीशा आठवे (परभणी), प्रशंसनीय रियांशी होणकर (लातूर) व विनिशा बाट्टंगे (नंदुरबार), लक्षवेधी गार्गी मानकर (छत्रपती संभाजीनगर), व ध्वज मुनोत (अहिल्यानगर). मोठा गट (वय वर्षे ११ ते १५) सर्वोत्कृष्ट - सायली जुमडे (अमरावती), उत्कृष्ट: आर्या हिवाळे (कल्याण), उत्तम: गार्गी जाधव (लातूर), प्रशंसनीय साध्वी लाड (परभणी) व संबोधी इंगोले (जालना). लक्षवेधी कौमुदी साल्पेकर (नागपूर) व विरा चांदोडकर (छत्रपती संभाजीनगर). समूह गट - सर्वोत्कृष्ट: इको इम्पॅक्ट फाउंडेशन गेवराई, उत्कृष्ट: ज्ञानवर्धिनी, चाकण, उत्तम: डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, भिंगार अहिल्यानगर. प्रशंसनीय लोकमान्य टिळक विद्यालय, नंदुरबार व ज्ञानेश्वर विद्यालय, जालना. लक्षवेधी सिद्धेश्वर विद्यालय, जिंतूर व सह्याद्री विद्यामंदीर, भांडूप.

# भिंगारमध्ये घराबाहेर लावलेली मोटारसायकल अज्ञात इसमाने पेटवली; गुन्हा दाखल

नगर - भिंगार शहरातील सदर बाजार परिसरात एका दुचाकीला अज्ञात इसमाने पेटवून दिल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पोर्णिमा गौतम आठवले यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर बाजार येथील शनिमंदिरा जवळ राहणाऱ्या पोर्णिमा आठवले यांची होंडा कंपनीच्या मोपेड दुचाकीवर (क्र.एम.एच. १६ बी.आर. ०८६८) ११ ऑगस्टला पहाटे १.२० वाजेच्या सुमारास अज्ञात इसमाने ज्वलनशील पदार्थ टाकून तिला आग लावली. या आगीत दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे.

या घटनेनंतर पोर्णिमा आठवले यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३२६ (फ) नुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार गारुडकर करत असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीचा शोध सुरू आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### ॲसिडीटीपासून मिळवा आराम

एसिडिटी आणि पचनाच्या समस्यांपासून मुक्ती मिळवण्यासाठी घरातील साधे आणि सोपे घटक अत्यंत गुणकारी ठरतात. प्राचीन काळापासून आयुर्वेदात आपल्या स्वयंपाकघरातील अनेक पदार्थांना 'औषधाचा राजा' मानले जाते आणि आता आधुनिक आरोग्यशास्त्रानेही या घरगुती उपायांना 'सुपरफूड'चा दर्जा दिला आहे. जिरे, ओवा, आले आणि बडीशेप यांसारखे घटक पाचक एन्झाईम्स आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात. यातील घटक पचनक्रिया सुधारतात, शरीरातील सूज आणि पोटातील जळजळ कमी करतात तसेच गॅस व अपचनापासून त्वरित आराम मिळवून देण्यास मदत करतात. पोटाचे आरोग्य जपण्यासाठी हे उपाय रामबाण आहेत कारण एका चमच्याच्या प्रमाणात नियमित सेवनाने पोटाच्या अनेक समस्या दूर होतात. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि पोटाचा त्रास कमी करण्यासाठी ताक, गुळ आणि थंड दूध हे सर्वोत्तम पर्याय आहेत, कारण यात कॅलरीजचे प्रमाण योग्य आणि शरीराला थंडावा देणारे गुणधर्म असतात. यात असणारे पोषक घटक पचनसंस्था मजबूत करतात तर अँटीऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक बाहेर टाकतात. उन्हाळ्यात व रोजच्या आहारात शरीर थंड ठेवण्यासाठी, पित्त शांत करण्यासाठी आणि पचन सुधारण्यासाठी या उपायांचा मोठा उपयोग होतो. आयुर्वेदात या नैसर्गिक उपायांना पित्तशामक व भूक वाढवणारे मानले आहे. आंबट-गोड-तिकट चवींचे हे उपाय काढा, चहा, ताक किंवा मुखवास अशा अनेक प्रकारे वापरले जातात.

## पाककला

### चॉकलेट-नारळ पेढा

**साहित्य :** डेसिकेटेड कोकोनट (सुक्या खोबऱ्याचा कीस) २ कप, कंडेन्स्ड मिल्क १ कप, कोको पावडर २ चमचे, वेलची पावडर १/२ चमचा, तूप १ चमचा, पिस्त्याचे तुकडे आणि घोळवण्यासाठी थोडा सुक्या खोबऱ्याचा कीस.

**कृती :** एका कढईत १ चमचा तूप गरम करून त्यात २ कप डेसिकेटेड कोकोनट मंद आचेवर १ मिनिट परतून घ्या. आता त्यात १ कप कंडेन्स्ड मिल्क घाला आणि मिश्रण घट्ट होऊन कढई सोडेपर्यंत सतत हलवत शिजवून घ्या. गॅस बंद करून मिश्रणाचे दोन समान भाग करा. एका भागात वेलची पावडर आणि दुसऱ्या भागात २ चमचे कोको पावडर घालून दोन्ही भाग चांगले मळून घ्या. हाताला थोडे तूप लावून पांढऱ्या आणि चॉकलेट मिश्रणाचा एकेक छोटा गोळा एकत्र करून गोल पेढ्याचा आकार द्या. हे पेढे उरलेल्या खोबऱ्याच्या कीसमध्ये घोळवून वरून पिस्त्याचे तुकडे लावून सजवा.

## वास्तू

### जिम विषयक...

✻ डंबेल, बारबेल, ट्रेडमिल आणि मल्टिजिम मशीन यांसारखी जड उपकरणे दक्षिण किंवा नैऋत्य दिशेला ठेवावीत. वास्तुशास्त्रानुसार या दिशेला वजन ठेवल्याने जिममध्ये स्थिरता आणि संतुलन राहते.

✻ जिमच्या भिंतींसाठी पांढरा, हलका राखाडी, पिवळा किंवा हलका निळा यांसारख्या रंगांचा वापर करावा. हे रंग उत्साह आणि प्रेरणा देतात.

✻ जिमच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा मुख्य हॉलमध्ये कोणतीही नकारात्मकता दर्शवणारे चित्र लावू नये.

✻ त्याऐवजी ऊर्जावान आणि प्रेरणादायी चित्रे लावावीत.

## सौंदर्य

✻ दिवसभराची धूळ आणि मेकअप काढण्यासाठी रात्री झोपण्यापूर्वी प्रथम क्लिन्झिंग बाम किंवा कोमट तेलाने आणि नंतर सौम्य फेसवॉशने चेहरा धुवा.

✻ सकाळी बर्फाचा तुकडा मऊ सुती कपड्यात गुंडाळून चेहऱ्यावर हलक्या हाताने फिरवा. यामुळे चेहऱ्यावरील सुस्ती कमी होते.

## सल्ला

भेंडीची भाजी चिकट होत असेल, तर भाजी शिजवताना त्यात लिंबाच्या रसाचे काही थेंब टाका किंवा १ चमचा भाजलेले बेसन घाला. यामुळे भेंडीचा चिकटपणा पूर्णपणे निघून जातो आणि ती कुरकुरीत होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, मघा २८।३९, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. १३ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिक लाभ होईल आणि कामात यश मिळेल.

**वृषभ :** जुनी अडकलेली कामे पूर्ण होऊन आनंद मिळेल.

**मिथुन :** व्यवसायात नवीन संधी आणि धनलाभाचे योग आहेत.

**कर्क :** कौटुंबिक सुख लाभेल आणि मन प्रसन्न राहील.

**सिंह :** नोकरीत प्रगती होईल आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** धार्मिक कार्यात यश आणि शुभ बातम्या मिळतील.

**तूळ :** व्यापारात वाढ होऊन आर्थिक स्थिती सुधारेल.

**वृश्चिक :** सर्व महत्त्वाच्या निर्णयात यश आणि लाभ मिळेल.

**धनु :** नवीन जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडता येतील.


**मकर :** सहकाऱ्यांचे सहकार्य मिळेल आणि योजना पूर्ण होतील.

**कुंभ :** व्यवसायात प्रगती होईल आणि मतभेद मिटतील.

**मीन :** उत्पन्नाचे मार्ग वाढतील आणि नशिबाची साथ लाभेल.

## शब्दगंध क्र. ७४९४

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अहमदनगर जिल्ह्यातील एक तालुका ३) देवादिकांचे अन्य रूपाने पृथ्वीवर येणे ६) वर्चस्व स्थापित करणे; उपहास करणे ८) रबरापासून बनविलेले ९) तपस्वी; ऋषी १०) राजस्थानातील हे लोक व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत १२) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात १३) लहान मासे १४) निकटपणा; घसट; सांनिध्यता १६) शिडी; सोपान; आंब्याची एक जात १७) निरर्थक चक्कर किंवा फेरी २०) नाव; गंधाचा टिळा २१) अतिलहान पिशवी; चंची २२) निष्णात; कुशल; तरबेज; तज्ज्ञ

**उभे शब्द :-** १) पण; शर्त २) लहान लहान मुले असलेली स्त्री ३) साहस करणारा; अघोर पंथातील माणूस ४) साबण वगैरेचा षटकोनी तुकडा ५) यामिनी; रात्र ७) दूध आटवून बनविलेले पक्वान्न; बासुंदी ९) खंडोबाला अर्पण केलेली स्त्री; विळी १०) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव ११) स्वाद; गोडी; चव १२) विवाहयोग्य मुलगी; वधू १४) जीत; सफलता; यश १५) अफलातून काम; युक्ती; शक्कल १६) चटणी वगैरे ज्यावर वाटतात तो दगड १८) गुंतगुंत १९) मुरली; बासरी; अलगूज २०) एक विषारी साप

### शब्दगंध क्र. ७४९३ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, आणि जो ते प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### हवा आपल्याला दिसत नाही, मग आपण ती कशी अनुभवतो?

हवा आपल्याला डोळ्यांनी दिसत नाही, हे अगदी खरे आहे; कारण हवा ही विविध वायूंचे मिळून बनलेली एक अदृश्य, रंगहीन आणि गंधहीन सरमिसळ आहे. नायट्रोजन, ऑक्सिजन, कार्बन डायऑक्साइड आणि इतर अनेक वायू आपल्या चारही बाजूंना अथांग पसरलेले आहेत, पण ते कधीही डोळ्यांना दिसत नाहीत. असे असले तरी, हवा अनुभवण्यासाठी आपल्याकडे निसर्गाने दिलेली स्पर्शेंद्रिये आणि शरीराच्या संवेदना आहेत. आपण ती कशी अनुभवतो, याचे सर्वात मोठे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे हवेचे वाहणे होय. जेव्हा हवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गतीने प्रवास करते, तेव्हा आपण तिला वारा असे म्हणतो. जेव्हा हा वारा आपल्या त्वचेला स्पर्श करून जातो, तेव्हा हवेच्या कणांचा तो दाब आणि गारवा आपल्याला स्पष्टपणे जाणवतो. कडक उन्हाळ्याच्या दिवसात घामाघूम झाल्यानंतर जेव्हा अचानक थंड वाऱ्याची झुळूक अंगावर येते, किंवा समुद्राच्या किंवा नदीच्या किनारीवर सुटलेला सुसाट वारा आपल्या अंगाला भिडतो, तेव्हा मिळणारा तो सुखद अनुभव केवळ आणि केवळ हवेचाच असतो.

याशिवाय, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या अनेक नैसर्गिक घटना आणि हालचालींवरून आपल्याला हवेचे अस्तित्व सतत जाणवत राहते. झाडांची हिरवी पाने जेव्हा हवेमुळे सळसळतात, झाडांच्या मोठ्या फांद्या वाऱ्याच्या वेगाने हलतात, किंवा आकाशात काळेभोर ढग हवेच्या रेट्यामुळे वेगाने इकडून तिकडे पळतात, तेव्हा मागे अदृश्य अशी हवाच ताकदीने काम करत असते. आपण घातलेले कपडे हवेच्या दाबाने अंगाभोवती कसे हलतात, हवेत उडणारे पक्षी कसे लीलया तरंगतात, किंवा घराच्या खिडक्यांमधून येणारी हवा कागद कसे उडवून नेते, या सर्व गोष्टींवरून हवेची उपस्थिती सिद्ध होते. कधी कधी जोराचे वादळ येते किंवा मान्सूनचा पहिला पाऊस पडण्यापूर्वी हवेत जोराचा दाब निर्माण होतो, ज्यामुळे हवेच्या प्रचंड शक्तीचा आणि तिच्या प्रचंड वेगाचा आपल्याला भयानक पण प्रत्ययकारी अनुभव येतो.

हवा अनुभवण्याचा आणखी एक सर्वात मोठा आणि जिवंत पुरावा म्हणजे आपला श्वासोच्छ्वास होय. आपण जिवंत राहण्यासाठी दर सेकंदाला, प्रत्येक क्षणाला हवेतील ऑक्सिजन आपल्या फुफ्फुसात घेत असतो आणि कार्बन डायऑक्साइड बाहेर सोडत असतो. जरी हा अदृश्य वायू आपल्याला दिसत नसला, तरी जेव्हा आपण दीर्घ श्वास घेतो तेव्हा आपली छाती फुगते आणि हवा शरीरात भरल्याची जाणीव आपल्याला होते. धावपळ केल्यावर किंवा व्यायाम केल्यावर जेव्हा आपले श्वासोच्छ्वास वेगाने चालू होतात, तेव्हा फुफ्फुसांमध्ये होणारी हवेची देवाणघेवाण आपल्याला स्पष्टपणे जाणवते.

घरात किंवा कार्यालयात आपण जेव्हा विजेचा पंखा, ए.सी. किंवा कुलर चालू करतो, तेव्हा कृत्रिमरीत्या निर्माण केलेली हवा आपल्या अंगावर येऊन आपल्याला थंडावा देते. सायकल किंवा गाडी वेगाने चालवताना तोंडावर आणि अंगावर जोराचा वारा आदळतो, ज्यामुळे हवेच्या रोधाची आणि तिच्या वेगाची प्रचिती येते. अशा प्रकारे, जरी हवा डोळ्यांना पूर्णपणे अदृश्य असली, तरी आपल्या त्वचेचा स्पर्श, निसर्गातील सळसळ, शरीराची श्वास घेण्याची क्रिया आणि आजूबाजूच्या प्रत्येक हालचालीमुळे आपण ती अगदी सहजपणे आणि दररोज अनुभवत असतो.

### खोटेपणाची शिक्षा

एका लहानशा गावात राहुल नावाचा एक तरुण राहत होता. त्याच्याकडेराखीव मेंढ्यांचा एक मोठा कळप होता. तो दररोज सकाळी मेंढ्यांना जंगलात चरण्यासाठी घेऊन जायचा आणि संध्याकाळी गावकऱ्यांसोबत परत यायचा.

राहुल खूप आळशी होता आणि त्याला सतत कुत्र्यांसारखे उद्योग किंवा कोणाशीतरी चेष्टा करायला आवडायची. एके दिवशी जंगलात बसल्याबसल्या त्याला एक खोडकर कल्पना सुचली. त्याला गावकऱ्यांना घाबरवून मजा घ्यायची होती. तो अचानक गावकऱ्यांच्या दिशेने धावत सुटला आणि ओरडू लागला, वाचवा! वाचवा! लांडगा आला! लांडगा माझ्या मेंढ्यांवर हल्ला करतोय!

राहुलचा आवाज ऐकून गावातील लोक तातडीने हातात काठ्या आणि कुऱ्हाडी घेऊन जंगलाच्या दिशेने धावले. पण तिथे गेल्यावर त्यांना लांडगा कुठेही दिसला नाही. उलट राहुल तिथे बसून हसत होता आणि म्हणाला, मी नुसतीच तुमची मस्करी करत होतो, इथे कोणताही लांडगा बिंडगा आलेला नाही! गावकऱ्यांना त्याचा हा उपद्व्याप पाहून खूप राग आला आणि ते त्याला समजावून सांगून निघून गेले.

काही दिवसांनी राहुलने पुन्हा तीच गोष्ट केली. तो मोठ्याने ओरडला, लवकर या, लांडगा आला रे आला! गावकऱ्यांनी आदल्या दिवशीचा अनुभव विसरून मदतीसाठी धाव घेतली, पण तिथे गेल्यावर पुन्हा राहुल त्यांना हसताना दिसला. गावकरी खूप संतापले आणि राहुलला कडक शब्दात ताकीद देऊन निघून गेले की, आता यापुढे तो कितीही ओरडला तरी कोणीही त्याच्या मदतीला येणार नाही.

त्यानंतर खरोखरच काही दिवस गेले. एके दिवशी संध्याकाळच्या वेळी जंगलात खरोखरच एक भुकेलेला लांडगा मेंढ्यांच्या कळपात घुसला. लांडग्याला पाहून राहुल प्रचंड घाबरला. तो जीव वाचवण्यासाठी एका झाडावर चढला आणि गावकऱ्यांच्या दिशेने रडत-रडत ओरडू लागला, वाचवा! वाचवा! आज खरोखरच लांडगा आलाय! माझ्या मेंढ्या मारून खातोय! मला वाचवा!

राहुलचा आवाज गावकऱ्यांपर्यंत पोहोचला. गावकऱ्यांनी एकमेकांकडे पाहिले आणि ठरवले, हा राहुल पुन्हा नेहमीप्रमाणे खोड्या करत असेल. त्याच्या खोट्या गोष्टींवर आता विश्वास ठेवण्यात काही अर्थ नाही. कोणीही त्याच्या मदतीला गेले नाही.

इकडे लांडग्याने राहुलच्या अनेक मेंढ्या फस्त केल्या आणि तो निघून गेला. राहुल झाडावरून खाली उतरला तेव्हा त्याचे खूप मोठे नुकसान झाले होते. तो डोक्यावर हात मारून रडू लागला, कारण त्याला समजले होते की, त्याने केलेल्या वारंवार खोटेपणामुळे आज त्याचे खरोखरचे संकट कोणीही गांभीर्याने घेतले नाही.

बोध : जो माणूस वारंवार खोटे बोलतो, लोक त्याच्यावर कधीही विश्वास ठेवत नाहीत; मग जरी त्याने कधी सत्य बोलले तरी कोणीही त्यावर विश्वास ठेवत नाही.

## आत्मशक्ति



### शाकाहार आणि अहिंसा

तुला मारणार नाही. बोकडाने म्हटले, त्यामुळे काही फरक पडणार नाही. तुम्ही मला मारा अथवा मारू नका, आज मला मरावेच लागेल.गुरूंनी त्याला आश्वासन दिले, काळजी करू नकोस ! मी तुझे रक्षण करील व तुला कोणत्याही प्रकारचे कष्ट होणार नाहीत, ह्याची काळजी घेईल.बोकडाने म्हटले, आपण घेतलेली कोणतीही काळजी माझे रक्षण करू शकणार नाही. केल्या कर्माचे फळ मला भोगावेच लागणार.गुरूंना, त्या बोकडाला कोणत्याही परिस्थितीत वाचवायचे होते. त्यासाठी त्यांनी आपल्या शिष्यांना त्याच्या मागे-मागे राहण्याचा व त्याचे रक्षण करण्याचा आदेश दिला. काही वेळाने बोकडाला भूक लागली. त्याने शिष्यांना सांगितले, त्या पर्वत शिखरांवर झाडपाला उगवलेला आहे. तो खाण्यासाठी मी जात आहे. जेव्हा बोकड पाने खात होता तेव्हा आकाशात वीज कडाडली व ती शिखरावर पडली. पर्वतावरील एक दगड निखळून बोकडाच्या मानेवर आदळला व तत्क्षणी बकरा मेला.जेव्हा शिष्यांनी गौतम बुद्धांना ह्या गोष्टीबद्दल विचारले तेव्हा ते म्हणाले, तुम्हाला केल्या कर्माचे फळ भोगावेच लागते हे कळाले तर तुम्ही कोणा जनावराचा किंवा प्राण्याचा वध करणार नाही. लक्षात घ्या की, आपल्याला आपल्या प्रत्येक पापाचे फळ भोगावेच लागते.काही लोक शाकाहारी असतात, त्यांचा धर्म तसे सांगतो. कारण ते कर्मावर विश्वास ठेवतात किंवा 'तुम्ही कुणालाही मारणार नाही' ह्या विधानाचे पालन करतात. काही लोक असे मानतात की प्रत्येक प्राणीमात्रास जगण्याचा अधिकार आहे म्हणून ते शाकाहारी असतात. जो जीवनदान देऊ शकत नाही त्याला जीव घेण्याचा काहीही अधिकार नाही. इतिहासात अनेक मान्यवर लोक शाकाहारी होते. प्लेटो, प्लोटिनस, एम्पेडोलस, अपोलोनियस, प्लूटार्क आणि पोरफायरी शाकाहारी भोजन घेत होते. (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नवीन जीवन

शिवानीदी : हो, नवीन वातावरणात रुळण्यासाठी तो आत्मा थोडा वेळ घेईल.अजून एक शक्यता असू शकते. कदाचित त्या आत्म्याने मागच्या जन्मात काही कटू अनुभव घेतले असतील. समजा, मागच्या जन्मात तो आत्मा खूप ओरडून बोलणाऱ्या आणि शिव्या देणाऱ्या नवऱ्याची बायको असेल, तर तो तशा प्रकारच्या नकारात्मक ऊर्जेबाबत अधिक संवेदनशील असेल.बाळाच्या अशा वागण्याची अनेक कारणं असू शकतात. त्याच्यावर असलेला संस्कार त्याच्या पूर्वीच्या अनुभवामुळे किंवा सांस्कृतिक बदलामुळे असू शकतो किंवा ते आता ज्या कुटुंबात जन्मलं आहे त्या कुटुंबाकडून आलेला असू शकतो. आत्म्यावर हा संस्कार आहे हे आपण स्वीकारायला हवं आणि मग तो हळूहळू बदलण्यासाठी मदत करायला हवी. हे करताना त्या आत्म्याकडे कोणत्याही प्रकारे वेदनेची आणि काळजीची स्पंदन पोहोचणार नाहीत ह्याची काळजी घ्यावी लागेल.

सुरेश ओबेरॉय : तुम्ही म्हणालात पालकांनीही तणावमुक्त राहिलं पाहिजे.

शिवानीदी : घरामध्ये तणावाची आणि काळजीची ऊर्जा असायला नको. या काळात आत्म्याला सशक्त बनवणं खूप सोपं आहे कारण, बाळ पालकांमधली आणि वातावरणातली ऊर्जा शोषून घेतं.

सुरेश ओबेरॉय : कोणासाठी सोपं आहे?

शिवानीदीदी : बाळासाठी.

सुरेश ओबेरॉय : पण हे पालकांसाठी सोपं नाही, कारण त्यांना कदाचित तणावामध्ये राहायची सवय झाली असेल.

शिवानीदीदी : पण बाळाचीदेखील त्यांच्यावर जबाबदारी आहेच.

सुरेश ओबेरॉय : त्यांना त्यांचा स्वभाव बदलावा लागेल का? त्यांच्या कुटुंबाकडून त्यांच्यावर झालेल्या संस्कारांमध्ये ते कदाचित बांधले गेले असतील.

शिवानीदीदी : जर त्यांनी ठरवलं तर ते याकडे संपूर्ण लक्ष देऊ शकतात. पालक मुलांच्या बाबतीत - त्यांचं खाणं, झोपेच्या वेळा, झोप, कपडे, इ. अनेक गोष्टींची काळजी घेतात. आई बाळाबरोबरच तिचा वेळ घालवत असते. त्यामुळे ते त्यांच्या संस्कारांची काळजी नक्कीच घेऊ शकतात. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, लग्न झाल्यापासून तुम्ही मला कुठेच बाहेर फिरायला नेलं नाही...

नवरा : अगं, पण मी तुला थेट माझ्या हृदयात स्थान दिलंय ना!

बायको : ते ठीक आहे हो, पण तिथून जवळच शॉपिंग मॉल किंवा पाणीपुरीची गाडी आहे का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ 'ऑलिंपिक' खेळांची सुरुवात प्राचीन काळात कोणत्या देशात झाली होती?

- ग्रीस

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### बाजरी

स्वादपूर्ण, रुचकर, बाजरीची भाकरी अनेकांची आवडती आहे. बाजरीची भाकरी व मिरचीचा ठेचा हा गरिबांचा नेहमीचा आहार आहे. बाजरीची भाकरी, गूळ व तूप हा ग्रामीण भागातील जनतेचा तसेच शारीरिक कष्ट करणाऱ्या लोकांचा आवडता खाद्यपदार्थ आहे. स्वादिष्ट, रुचकर आणि अधिक उष्णतेच्या बाजरीच्या भाकरीचा उपयोग प्रत्येकाच्या स्वयंपाकघरामध्ये होत असतो. मराठीत 'बाजरी', हिंदीमध्ये 'बाजरा', संस्कृतमध्ये 'इक्षुप्त्र', तर शास्त्रीय भाषेत 'पेनिसेटम ग्लॉसम' या नावाने ओळखली जाणारी बाजरी 'पोएसी' कुळातील आहे. बाजरीचे रोप पाच ते सहा फूट उंच असून, त्याची पाने लांब असतात. या रोपाच्या टोकाला कणसे लागतात व त्यातच बाजरीचे दाणे असतात.भारतामध्ये उत्तर गुजरात, महाराष्ट्र, कच्छ व राजस्थानमध्ये बाजरीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. बाजरीच्या पांढरी, कंजरी, देशी अशा अनेक जाती आहेत. सध्याच्या काळात बाजरीच्या सुधारलेल्या संकरित प्रकारांच्या अनेक जाती निघालेल्या आहेत. साधारणत: पावसाळ्यात भरपूर पाऊस पडल्यानंतर बाजरीची पेरणी रेताड जमिनीत केली जाते.औषधी गुणधर्म :आयुर्वेदानुसार : बाजरी मधुर, कषाय व उष्ण आहे. तसेच ती अग्निदीपक, पित्तप्रकोपक, पचण्यास जड, हृदयासाठी गुणकारी आहे. बाजरीमध्ये पिष्टमय पदार्थ जास्त प्रमाणात असतात. **(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आदिवासी संस्कृती, ज्ञानपरंपरा, निसर्गसंवर्धनाची परंपरा जपली पाहिजे

### जागतिक आदिवासी दिनानिमित्त प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांचे आवाहन

नगर – आदिवासी समाज निसर्गाला ओरबाडत नाही, तर निसर्गाशी सहजीवन साधत त्याचे संवर्धन करतो. जल, जंगल, जमीन, नद्या आणि डोंगर यांच्याशी आदिवासी समाजाची अतूट नाळ जोडलेली आहे. धरतीमाते बद्दल कृतज्ञता बाळगणारी आदिवासी संस्कृती ही समृद्ध ज्ञानपरंपरा, जीवनमूल्ये आणि निसर्गसंवर्धनाची शिकवण देणारी परंपरा आहे. ही संस्कृती, ज्ञानपरंपरा आणि निसर्गाशी असलेले नाते नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले.


आदिवासी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांना आदिवासी समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.

९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदाची सूचना संस्थेचे सहसचिव शिवानंद भांगरे यांनी मांडली. तर त्यास अनुमोदन संस्थेचे सचिव कविराज बोटे यांनी दिले. यावेळी माजी नगरसेविका प्रतिमा भांगरे, कार्यकारी अभियंता किरण देशमुख, सेवानिवृत्त साखर आयुक्त ज्ञानदेव मुकणे, सेवानिवृत्त अधीक्षक रामभाऊ कचरे, सुरेश देशमुख, संजय गंभीरे, धुळे येथील उपजिल्हाधिकारी गंगाराम तळपाडे, प्रा. भाऊराव नाडेकर, ॲड. लक्ष्मण डामसे, माजी सहसंचालक डॉ. पी. डी. गांडाळ, प्रा. डॉ. नितीन तळपाडे, आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक संजय साबळे, तसेच संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे यांनी प्रास्ताविक संस्थेच्या कार्याचा घेतला आढावा घेतला. कोतूळ येथून सोमनाथ लेंभे यांनी आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाला विशेष उपस्थितीची शोभा वाढविली. त्यांच्या या आपुलकीच्या सहभागाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

आदिवासी दिन कार्यक्रमात नृत्य, गाणे आणि समाजातील चांगल्या कार्याला प्रोत्साहन, गुणवंतांचा सन्मान करीत पुढील पिढीसाठी संस्थेने आदर्श निर्माण केला. कार्यक्रमाला पुणे येथील कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी आवर्जून उपस्थिती लावली. आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून त्यांनी आदिवासी दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. आदिवासी तरुण–तरुणींनी शिक्षणाच्या माध्यमातून पुढे यावे, शिक्षण हीच काळाची गरज आहे, अशी प्रेरणादायी भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात आदिवासी शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या पावरा नृत्याने उपस्थितांची विशेष दाद मिळविली. विद्यार्थ्यांनीही पारंपरिक पावरा नृत्य सादर करून कार्यक्रमात सांस्कृतिक रंग भरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पारंपरिक वेशभूषेत भव्य मिरवणूक काढण्यात आली. हातात विविध संदेशांचे बॅनर घेऊन समाजबांधव घोषणांच्या गजरात सहभागी झाले होते. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने निघालेल्या या मिरवणुकीत महिला, युवक, विद्यार्थी आणि ज्येष्ठ समाजबांधवांचा मोठा सहभाग होता.पारंपरिक वाद्ये, लोककला, पावरा नृत्य आणि पारंपरिक वेशभूषेमुळे मिरवणुकीत आदिवासी संस्कृतीचे वैभवपूर्ण दर्शन घडले. कोहणे येथील राजा हरिश्चंद्र लेझीम पथकाने मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमात समाजासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना आदिवासी समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सहादु भांगरे, डॉ. विष्णू बुळे, अशोक धिंदळे, प्रा. डॉ. नितीन तळपाडे, लेफ्टनंट प्राध्यापक भरत डगळे, चिंधू भांगरे, दिगंबर नवाळी, साईनाथ वाळेकर आणि यशवंत झडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात दिनकर भांगरे, मनोहर कोंडार, रामचंद्र सुपे, निवृत्ती गभाले आणि विठ्ठल म्हशाळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त सपत्नीक सन्मान करण्यात आला. तसेच सिद्धी धिंदळे, अथर्व भांगरे, ज्योती भांगरे, अवंतिका सावळे, तेजस गोडे आणि आदिश्री बोकड यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या गुणवत्तेला आणि कर्तृत्वाला प्रोत्साहन देण्यात आले.

कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ सावळे, उपाध्यक्ष हिरामण पोपेरे, सचिव कविराज बोटे, सहसचिव शिवानंद भांगरे यांच्यासह सुभाष भांगरे, दिनकर भांगरे, भरत साबळे, सोमनाथ शिंगाडे, प्रा.भाऊराव नाडेकर आणि तुकाराम बारामते यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. भाऊराव नाडेकर आणि तुकाराम बारामते यांनी केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

### सद्विचारांची संगत लाभावी

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स




धनदौलत लाभावी, नावलौकिकात भर पडावी. पुत्रपौत्रप्राप्ती व्हावी, ऐश्वर्य व समुद्धी सतत वाढावी, म्हणून मी श्रमतो. असा मी एकटाच नाही, तर कित्येक आहेत. केले आहेत श्रम आणि व्रतवैकल्ये आम्ही सगळ्यांनी, पण हे सर्व टिकाउ आहे का? भगवतगीता म्हणते,

देह झिजवून, मन शिणवून, कित्येकांना दुखवून मिळवली आहे ही सत्ता संपत्ती आणि समृद्धी. स्वर्गसुखच लाभले आहे. केवढे सुख, केवढी चैन। पण याला गणती नसली, तरी गळती आहे. हे सगळे ऐश्वर्य सुख हळुहळू खंगते, मग संपते, अशांना मग भविष्य कुठले? कारण त्यांचे पुण्य संपले आता सुखसमाधान आटले. उलट लागली. हूरहूर. मिळतील का आणखी सुखोपभोग वेगवेगळे? मग पुन्हा श्रम. पुन्हा सत्तासंपतीच्या प्राप्तीच्या वाटांवर पायपीट. पण आता भय मृत्यूचे. शरीर व मन थकलेले, कितीदा तुडवायची तीच ती वाट? जाणे येणे, श्रमणे, त्याच त्याच सुखोपभोगाचे मागणे आणि लाचार जगणे. बा माणसा, हेच का जन्माचे सार्थक होणे ? त्यापेक्षा नकोच हे पुन:पुन्हा जन्मणे.

पण असा त्रागा का करणे ? उलट तुकाराम महाराज म्हणतात. तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी । देवा, आम्हाला जन्माला घाल. सुखच आहे तेथे. त्या सुखाचे स्वरुप काय? या सुखासाठी धरायचे कुणाचे पाय ? हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी । नलगे मुक्ति धन संपदा ।। संतसंग देई सदा ।।

पुनःपुन्हा जन्मणे हे सुखाचे लेणे. पण त्याचे स्वरुप ओळखणे मोलाचे. ऐश्वर्य, धन, संपत्ती असे उपभोगणे हे व्यर्थ जिणे. त्या जनार्दनाचे, जनताव्यापी पांडुरंगाचे आवडीने गुण गाणे. माणसामाणसांत भरलेल्या त्या विठ्ठलाला न विसरणे, जन्मोजन्मी हाच आनंद लुटणे. यासाठी सत्प्रवृत्ती आणि सद्विचार यांची संगत करणे. मग कशाला मृत्यूचे भय बाळगणे ?

एकदा देवदत्त बाहेर फिरायला गेला. एका वटवृक्षाखाली त्याला एक दरिद्री, दीन, दुःखाची वृद्ध दिसला. त्याला त्याची दया आली. त्याला त्याने एक रुपयाचे नाणे दिले. वृद्ध म्हणाला, त्या झाडाच्या ढोलीत टाक, माझ्याजवळ नको देउ. देवदत्ताने एक रुपया ढोलीत टाकला. तरी परतला. दारात दहा रुपये पडले होते. देवदत्त आनंदला. आपण एक रुपया ढोलीत टाकला तर दहा रुपये दारात येउन पडले? देवदत्ताच्या मनाला लोभ सुटला. आता दहा टाकले ढोलीत तर शंभर पडतील, असे वाटले. त्याने पुन्हा वृक्षाकडे धाव घेतली. ढोलीत दहा रुपये टाकले. घरी परतला. दारात काहीच नव्हते. देवदत्त परत ढोलीकडे गेला. टाकलेले दहा रुपये काढायला त्याने ढोलीत हात घातला. हाताला कडकडून विंचू चावला. दहा रुपयेही गेले, वर विंचवाची आग विकत घेतली. सकाम कर्म असेच भोवते. **– किशोर गांधी**

# नगरसह राज्यभर सिमेंटच्या शेतरस्त्यांचे जाळे उभारुन 'मिशन झिरो पेण्डन्सी'अभियानाला वेग देणार

### शरद पवळे यांची माहिती

नगर – राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीपर्यंत दर्जेदार सिमेंटचा शेतरस्ता पोहोचविण्याचा संकल्प महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने केला असून, अहिल्यानगरसह संपूर्ण राज्यात सिमेंटच्या शेतरस्त्यांचे जाळे उभारण्यासाठी व्यापक जनजागृती, मार्गदर्शन आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिली.

नगर तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण व 'मिशन झिरो पेण्डन्सी' अभियानाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अभियानात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवत शेतरस्त्यांशी संबंधित विविध समस्या, अडचणी आणि प्रलंबित प्रकरणे मांडली.

यावेळी बोलताना शरद पवळे म्हणाले की, राज्यातील हजारो शेतकरी आजही शेतरस्त्याअभावी स्वतःच्या शेतीपर्यंत सहज पोहोचू शकत नाहीत. अनेक सुपीक जमिनी केवळ रस्त्यांच्या अभावामुळे पडिक राहिल्या आहेत. शेतरस्त्यांशी संबंधित अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रशासकीय कार्यालयांमध्ये प्रलंबित असून, काही ठिकाणी चुकीच्या निर्णयांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ सातत्याने संघर्ष करत असल्याचे त्यांनी सांगितले.


नगर तालुक्यात आयोजित राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण सभेत बोलताना शरद पवळे.

या संघर्षामुळे शासनाने शेत–रस्त्यांसंदर्भात काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असले, तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. प्रत्येक पात्र शेतकऱ्याला हक्काचा शेतरस्ता मिळावा, प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली निघावीत आणि राज्यात 'मिशन झिरो पेण्डन्सी' यशस्वी व्हावे, यासाठी चळवळीचे पदाधिकारी राज्यभर जनजागृतीसह प्रशासनाशी समन्वय साधत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अभियानादरम्यान शेत– रस्त्यांबाबतचे शासन निर्णय, संबंधित कायदेशीर तरतुदी, हद्द निश्चितीची प्रक्रिया, अतिक्रमण हटविण्याची कार्यपद्धती तसेच शेतकऱ्यांनी करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या अभियानाला शरद पवळे, आशिष कासार, बाळासाहेब थोरात, पोपट शेळके, अक्षय जगताप, सचिन शेळके, सोमनाथ तोडमल, गणेश इंगळे, एकनाथ पवार, रामदास तनपुरे, विठ्ठल मिसाळ, दादासाहेब शिरसाठ, गोवर्धन शिरसाठ, कृष्णा चव्हाण, राजेंद्र शिरसाठ, जालिंदर आठरे, राहुल गट, आंबादास आव्हाड, विक्रांत कासार यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# फिरोदिया शिवाजियन्सच्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत रंगला चुरशीचा थरार

### सेंट मायकल स्कूलची विजयी घोडदौड; आर्मी स्कूल आणि ऑर्चिड स्कूलचेही दमदार विजय

नगर – फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत ५ ऑगस्ट रोजी विविध वयोगटांतील सामने अत्यंत चुरशीचे आणि रंगतदार झाले. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत आर्मी स्कूल, ऑर्चिड स्कूल आणि सेंट मायकल स्कूलच्या संघांनी दमदार कामगिरी करत विजय मिळवला. तर १६ वर्षांखालील मुलांच्या गटातील सेंट मायकल व तक्षिला स्कूल यांच्यातील सामना अखेर २–२ अशा बरोबरीत सुटल्याने उपस्थित प्रेक्षकांना अखेरच्या क्षणापर्यंत रोमांचकारी फुटबॉलचा अनुभव मिळाला.


फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत रंगलेला हा चुरशीचा क्षण.

सकाळच्या सत्रात १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्मी स्कूल (एमआयसी ण्ड एस) आणि ऊर्जा गुरुकुल यांच्यात सामना झाला. सामन्याच्या तिसऱ्या मिनिटाला पलक सोनानिया हिने आर्मी स्कूलसाठी गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर आर्मी स्कूलच्या बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी करत ऊर्जा गुरुकुलला अखेरपर्यंत एकही गोल करू दिला नाही. त्यामुळे आर्मी स्कूलने १–० अशा फरकाने विजयाची नोंद केली.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात जेएसएस गुरुकुल आणि ऑर्चिड स्कूल यांच्यातील सामना जेएसएस गुरुकुलचे खेळाडू नियोजित वेळेत मैदानावर उपस्थित न राहिल्याने खेळविण्यात आला नाही. नियमानुसार ऑर्चिड स्कूलला विजयी गुण प्रदान करण्यात आले.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात ज्ञानसंपदा स्कूल आणि ऑर्चिड स्कूल यांच्यात अत्यंत रंगतदार सामना झाला. सामना शेवटपर्यंत अटीतटीचा राहिला. २१ व्या मिनिटाला मोक्ष गरदास याने गोल करत ज्ञानसंपदा स्कूलला आघाडी मिळवून दिली. मात्र ऑर्चिड स्कूलने जोरदार पुनरागमन केले. ३० व्या मिनिटाला पार्श बंब याने गोल करत सामना बरोबरीत आणला, तर ३३ व्या मिनिटाला पुन्हा गोल झळकावत संघाला आघाडी मिळवून दिली. ज्ञानसंपदा स्कूलला आणखी गोल करू न देता ऑर्चिड स्कूलने २–१ अशा फरकाने शानदार विजय मिळवला.दुपारच्या सत्रात १२ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल स्कूल आणि तक्षिला स्कूल यांच्यात सामना झाला. सेंट मायकल स्कूलच्या सारांश बोरा याने १९ व्या मिनिटाला, तर युग कांकरिया याने २५ व्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. तक्षिला स्कूलला एकही गोल करण्याची संधी न देता सेंट मायकल स्कूलने २–० असा एकतर्फी विजय मिळवला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटातही सेंट मायकल स्कूलने आपला विजयी झेंडा कायम राखला. तक्षिला स्कूलविरुद्धच्या सामन्यात २१ व्या मिनिटाला शौर्य चंगेडिया याने पहिला गोल केला. त्यानंतर ३० व्या मिनिटाला अनिश झांजे याने आणखी एक गोल करत संघाची आघाडी दुप्पट केली. उत्कृष्ट बचावाच्या जोरावर तक्षिला स्कूलला एकही गोल करू न देता सेंट मायकल स्कूलने २–० असा विजय संपादन केला.

दिवसातील सर्वाधिक रोमांचक सामना १६ वर्षांखालील मुलांच्या गटात सेंट मायकल स्कूल आणि तक्षिला स्कूल यांच्यात झाला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच आक्रमक आणि वेगवान खेळाचे प्रदर्शन केले. ७ व्या मिनिटाला अरहान गुगळे याने सेंट मायकल स्कूलसाठी पहिला गोल केला. त्यानंतर २१ व्या मिनिटाला सुरज शेळके याने गोल करून संघाला २–० अशी मजबूत आघाडी मिळवून दिली. मात्र तक्षिला स्कूलने हार न मानता जोरदार पुनरागमन केले. ४२ व्या मिनिटाला गौरव लिलावत याने गोल करून संघाचे खाते उघडले. त्यानंतर सेंट मायकल स्कूलचा खेळाडू दक्ष कुलकर्णी याच्याकडून झालेल्या दुर्दैवी सेल्फ गोलमुळे तक्षिला स्कूलला आणखी एक गुण मिळाला आणि अखेर हा रोमांचकारी सामना २–२ अशा बरोबरीत संपला.


संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बालिकाश्रम रोडवरील सुडके मळा येथे संत सावता महाराजांना अभिवादन करण्यात आले.

# संत सावता महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

### ग्रीन सिटी अभियानात सहभागी होण्याचे आवाहन

नगर – संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त बालिकाश्रम रोडवरील सुडके मळा येथील संत सावता महाराज मंदिरात महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अहिल्यानगरचे उपमहापौर धनंजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्यांनी संत सावता महाराज यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संत सावता महाराजांनी आपल्या कार्यातून आणि अभंगवाणी मधून भक्ती, कष्ट, समता आणि समाजसेवेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहिताच्या उपक्रमांमध्ये प्रत्येकाने योगदान देण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

धनंजय जाधव यांच्या पुढाकारातून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नावाने ङ्गग्रीन सिटी अभियानङ्ख सुरू करण्यात आले असून, या माध्यमातून एक लाख वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला आहे. पर्यावरण संवर्धन हीदेखील समाजसेवाच असून, प्रत्येक समाजबांधवाने या अभियानात सहभागी होऊन वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी सुनिल सुडके, मच्छिंद्र सुडके, बबलू सुडके, स्वप्निल लेंडकर, स्वप्निल जाधव, गणेश सुडके यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# माथणी गावात १३ ऑगस्टपासून ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ

नगर – नगर तालुक्यातील माथणी गावात श्री हनुमान सेवानिमित्त १३ ऑगस्टला ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ होत आहे. त्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन माथणी गावकऱ्यांनी केले आहे. यावेळी विणा पूजन व व्यासपीठ श्रीक्षेत्र बाळनाथ गडाचे हभप धर्मनाथ महाराज मालुसरे करणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र वारकरी सांप्रदाय सेवा संघटनेचे उपाध्यक्ष हभप माऊली गायकवाड यांनी दिली.

या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खा. निलेश लंके, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, आ. विक्रम पाचपुते, आ. अक्षय कर्डिले, प्रा. शशिकांत गाडे आदी उपस्थित राहणार आहेत. या सप्ताहात पहाटे काकडा, सकाळी विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ, हरिकीर्तन, हरी जागर तसेच ज्ञानेश्वरी पारायण रोज सकाळी ७ ते ९ व दुपारी २ ते ४ या वेळेत होणार आहे. या सप्ताहामध्ये रोज रात्री ७ ते ९ हरिकीर्तनाचा कार्यक्रम होणार असून कीर्तन सेवा हभप मच्छिंद्र डरंगे, लक्ष्मण महाराज नांगरे, वसंत महाराज वसंतगडकर, हभप झेंडे महाराज, ज्ञानेश्वर महाराज कराळे, नंदकिशोर महाराज देवकर, हभप विकासानंद मिसाळ हे देणार आहेत. तरी भाविकांनी ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तनाच्या श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माथणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या सप्ताहाची सांगता २० ऑगस्ट रोजी सकाळी १० ते १२ हभप मंगेश महाराज मोरे (देहू) यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाने होईल. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भक्तगणांनी उपस्थित रहावे, असे आवाहन माऊली गायकवाड यांनी केले.

# मंदिर केंद्रीत व्यवस्था निर्माण झाल्यास हिंदू समाजाला पुनर्वैभव प्राप्त होईल

नगर – पुरोहितांचे हिंदू जीवनातील स्थान महत्त्वाचे आहे. पूर्वी हिंदू जीवन पद्धती मंदिर अर्चक आणि पुरोहित या व्यवस्थेची अनुकूल होती. जोपर्यंत हिंदू जीवनपद्धती मंदिर केंद्रित होती तोपर्यंत हिंदू समाजाकडे वाकडी नजर करून बघण्याची कोणाकडे ही शक्ती नव्हती.ज्यावेळेस हिंदुस्थानात परकीय शक्तींची आक्रमणे झाली.त्यावेळेस त्यांनी मंदिर व्यवस्था मोडीत काढण्यासाठी मंदिरांवर हल्ले करून मंदिराचे अस्तित्व संपवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. हिंदू धर्मा विरोधात ज्यांनी आक्रमणे केली त्यांची जीवन व्यवस्था आजही उपासना पद्धतीने नुसार आहे.


विश्व हिंदू परिषद, मंदिर अर्चक पुरोहित आयाम व ब्राह्मण सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अर्चक, पुरोहित सेवा शिबिर प्रसंगी उपस्थित बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी, हभप मोहनबुवा रामदासी व इतर.

विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर, अर्चक, पुरोहित या आयामाच्या वतीने समाजातील अर्चक व पुरोहित यांचे एकत्रीकरण होत आहे. तसेच त्यांच्या आरोग्याच्या समस्या तसेच विविध सरकारी योजनांच्या माध्यमातून त्यांचा विकास होण्यास मदत होईल. मंदिर केंद्रीत व्यवस्था निर्माण झाल्यास हिंदू समाजाला पुनर्वैभव प्राप्त होईल.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद,बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.

कर्जत येथील साई हॉटेल येथे विश्व हिंदू परिषद, मंदिर अर्चक पुरोहित आयाम व ब्राह्मण सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अर्चक, पुरोहित सेवा शिबिर संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत हभप मोहनबुवा रामदासी, बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी, ॲड. सुधीर भापकर, स्वागताध्यक्ष प्रसाद ढोकरीकर, महंत पागल बाबा, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत प्रमुख समीर घरोटे, प्रांत सदस्य ॲड. जयदीप देशपांडे, विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, महेश वैद्य, डॉ.विलास मढीकर, गौरव पठाडे, इंडो आयरिशचे डॉ.राकेश जोंधळे, उमेश देशमुख, आशिष निलेंगे, स्वप्निल देसाई, अनिल गदादे, विनोद दळवी, प्रसाद शहा आदी उपस्थित होते.

मोहनबुवा रामदासी यांनी धर्म, संस्कार आणि समाज जागृतीच्या माध्यमातून पुरोहितांनी निभावायच्या जबाबदाऱ्यांवर भाष्य केले. तसेच आज समाजामध्ये खऱ्या अर्थाने पौरोहित्य करणाऱ्या कुटुंबातील मुलांची लग्न होत नाहीत. याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त करतानाच याबाबत विहिंपसारख्या व्यासपीठावरून याबाबत उपाययोजना करण्यात याव्यात, अशी सूचना मांडली.

समीर घरोटे म्हणाले, पुरोहित सेवा शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील अर्चक पुरोहितांना श्रमिक कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे सरकारच्या सर्व योजनांचा लाभ मिळेल व पुरोहित वर्ग सशक्त होईल. कार्यक्रमात अर्चक–पुरोहितांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. ई–श्रम कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड आदी योजनांचे मार्गदर्शन करण्यात आले. २०० हुन अधिक पुरोहितांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी कर्जत, जामखेड व श्रीगोंदा, पाटोदा तालुक्यातील अर्चक, पुरोहित वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अर्चना भणगे यांनी स्वागतगीत सादर केले. गजानन चावरे यांनी प्रास्ताविकात शिबिराच्या उद्दिष्टांची माहिती दिली. सूत्रसंचालन उमेश चावरे यांनी केले. प्रसाद ढोकरीकर यांनी आभार मानले.

# पत्नीला राहायचेय बॉयफ्रेंड सोबत!



लग्नानंतर परपुरुष किंवा परस्त्री एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात आली, तर संसाराची राख व्हायला वेळ लागत नाही. विवाहबाह्य संबंध चुकीचेच आहेत; पण लग्नानंतर आयुष्यात आलेल्या तो किंवा ती यांच्याबद्दल ओढ प्रचंड वाढली, तर माणसं कुठलंही पाऊल उचलताना मागचा-पुढचा विचार करत नाहीत. सोबत राहण्यासाठी म्हणून टोकाची पावलं उचलल्याची अनेक उदहारणं आहेत. मध्य प्रदेशच्या ग्वालियरमध्ये असंच एक हैराण करणारं प्रकरण समोर आलंय. एक व्यक्ती पोलिस अधीक्षक कार्यालयात आली. पत्नीपासून जीवाला धोका असल्याचं सांगत तिने पोलिस संरक्षणाची मागणी केली. तिने सांगितलं, की बॉयफ्रेंडलाही सोबत घरात राहू द्यावं म्हणून पत्नी हट्ट करत होती. मी याला विरोध केला म्हणून पत्नीने मला बेदम मारहाण केली आणि मुलांना घेऊन फरार झाली.


ग्वालियरच्या सिकंदर कंपू भागात राहणाऱ्या राजकुमार कुशवाहचं २००८ साली पूनम कुशवाहसोबत हिंदू पद्धतीने लग्न झालं. दोघांचं वैवाहिक आयुष्य आनंदात सुरू होतं. त्यांना चार मुलं झाली. सुरुवातीला सर्व काही चांगलं होतं; पण नंतर वैवाहिक आयुष्यात वादविवाद, भांडणं सुरू झाली. २२ जानेवारी २०२६ रोजी पती राजकुमारला काहीही न सांगता पूनम घरातून निघून गेली. बरीच शोधाशोध करूनही काही माहिती मिळाली नाही. मार्च २०२६ मध्ये अचानक ती परत घरी आली. घरी आल्यावर विचारलं, इतके दिवस कुठे होती, तेव्हा तिने आशू ऊर्फ कमल सेन नावाच्या युवकासोबत रिलेशनशिपमध्ये असल्याची कबुली दिली. मागच्या दोन महिन्यांपासून ती त्याच्यासोबतच होती.

राजकुमारच्या म्हणण्यानुसार पूनम घरी आल्यानंतर तिने अजब अट ठेवली. पत्नी म्हणून मी संसार करावा अशी राजकुमारची इच्छा असेल, तर बॉयफ्रेंड आशूसुद्धा सोबत राहिलं अशी तिने अट घातली. राजकुमारने तिची ही अनैतिक अट धुडकावून लावली. त्यानंतर घरात तणाव वाढला. सतत भांडण व्हायची. ५ मे २०२६ रोजी सकाळी पत्नी पुन्हा न सांगता घरातून निघून गेली. दुपारी परत आली, तेव्हा राजकुमारला खोट्या प्रकरणात अडकवण्याची धमकी दिली. त्यांच्यात पुन्हा भांडण सुरू होताच पूनमने जवळची वीट उचलली व राजकुमारच्या डोक्यात घातली. जखमी झाल्यानंतर राजकुमारने पोलिस ठाणं गाठलं

## कॅलिडोस्कोप

# फक्त नऊ रुपयांची पगारवाढ?

दिल्लीतील एका नामांकित 'एमएनसी' कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनीअर म्हणून काम करणाऱ्या तरुणाची व्यथा 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाली आहे. त्याने लिहिलेल्या पोस्टमध्ये तो म्हणतो, मी एका खड्ड्यात अडकलोय, बाहेर पडायचं कसं कळत नाहीये. २०२४ मध्ये कॉलेज संपल्यावर मार्केटमध्ये नोकरीची संधी कमी होती. त्यामुळे या इंजिनिअरने दिल्ली एनसीआरमधील या 'एमएनसी' मध्ये इंटर्न म्हणून सुरुवात केली. नंतर त्याला सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून बढती मिळाली. वार्षिक पॅकेज ४.२५ लाख रुपये होते; पण हातात येणारा पगार अपेक्षेपेक्षा खूप कमी होता. दोन वर्षांचा बाँड



आणि नोटीस पीरियडही होता म्हणून तो अडकला. पहिल्या वर्षी कंपनीने त्याच्या पगारात फक्त ९ रुपये वाढ दिली. या वर्षी तर तेवढीही वाढ देण्याची तसदी घेतली नाही. दोन वर्षे तो अगदी त्याच पगारावर काम करतोय. ऑफिस आणि क्लायंट साइटला जाण्यासाठी प्रवास खर्चही कंपनी देत नाही. उलट मुख्य कॅम्पसला शटलने जाण्यासाठी पगारातून हजारोंची रक्कम कापली जाते. मी गुलामासारखं काम करतोय, असं त्याने लिहिलं.

प्रोजेक्टमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याचे पॉईंट्स खराब केले गेले, तरीही तो आपल्या कामाची गुणवत्ता कधीच कमी करत नाही. पैसे, वागणूक किंवा वातावरण कितीही वाईट असलं तरी माझ्या कामाशी मी तडजोड करणार नाही, असं तो म्हणतो. आठवड्याच्या शेवटीही काम करावं लागतं. ही पोस्ट 'सोशल मीडिया'वर जोरदार चर्चिली गेली.



# अपघातानंतर चोरी!


उत्तर प्रदेशातील कौशांबी येथे महामार्गावर बकऱ्यांनी भरलेला ट्रक जण जखमी झाले, तर अनेक बकऱ्यांचा मृत्यू झाला; पण या दुर्घटनेपेक्षाही अधिक धक्कादायक बाब म्हणजे अपघातानंतर काही लोकांनी मदत करण्याऐवजी बकऱ्या उचलून नेण्यास सुरुवात केली.

कौशांबी जिल्ह्यातील कोखराज परिसरात हा अपघात झाला. कानपूरहून प्रयागराजकडे जाणाऱ्या ट्रकमध्ये दोनशेहून अधिक बकऱ्या भरलेल्या होत्या. वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने ट्रक रस्त्याच्या कडेला पलटला. अपघात इतका भीषण होता, की ट्रकमधील काही लोक आत अडकले आणि अनेक बकऱ्या रस्त्यावर फेकल्या गेल्या.

काहींचा जागीच मृत्यू झाला, तर अनेक गंभीर जखमी झाल्या. सामान्यतः अशा वेळी लोक धावून येतात, जखमींना मदत करतात, रुग्णवाहिका बोलावतात किंवा पोलिसांना माहिती देतात, अशी अपेक्षा असते; पण या घटनेत काही लोकांनी परिस्थितीचा गैरफायदा घेत बकऱ्या घेऊन जाण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. कोणी खांद्यावर बकरी टाकून जात होते, तर काही जण त्या पकडून पळताना दिसत होते. अपघातातील मानवी वेदनेपेक्षा स्वतःचा फायदा अधिक महत्त्वाचा वाटणारी ही मानसिकता चिंताजनक आहे.

या घटनेत आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे प्राण्यांप्रती असलेली असंवेदनशीलता. वाहतुकीदरम्यान प्राण्यांची कोंडी, असुरक्षित वाहतूक आणि त्यांच्याशी होणारी अमानुष वागणूक हा स्वतंत्र चिंतेचा विषय आहे.


# ... म्हणून नाकारली नोकरी!



नोकरीची मुलाखत म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या शिक्षण, कौशल्य, अनुभव आणि व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करण्याची प्रक्रिया मानली जाते; परंतु मुलाखतीत उमेदवाराच्या क्षमतेऐवजी त्याच्या शरीरावर, वजनावर किंवा दिसण्यावर टिप्पणी केली जाऊ लागली, तर ती केवळ असंवेदनशीलता राहत नाही. ती थेट भेदभावाची बाब ठरते. अलीकडे 'सोशल मीडिया'वर व्हायरल झालेल्या एका घटनेने हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आणला आहे. दक्षिण कोरियातील एका मुलीला 'जाड' असल्याच्या कारणावरून नोकरी नाकारण्यात आल्याचा दावा करण्यात आला आणि मुलाखतीदरम्यान तिला विचारण्यात आलेला प्रश्न अनेकांना हादरवून गेला, ' तू स्वतःचे वजन नियंत्रित करू शकत नाहीस, तर काम कसे सांभाळशील?'

ही घटना केवळ एका मुलीपुरती मर्यादित नाही. ती आजच्या समाजातील एका खोलवर रुजलेल्या मानसिकतेचे प्रतिबिंब आहे. इथे व्यक्तीच्या कौशल्यापेक्षा तिच्या बाह्यरूपाला अधिक महत्त्व दिले जाते. आधुनिक जग प्रगती, समानता आणि व्यावसायिकतेबद्दल बोलत असले तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी शरीरयष्टीच्या आधारावर लोकांचे मूल्यमापन केले जाते. विशेषतः महिलांना या प्रकारच्या 'बॉडी शेमिंग'चा अधिक सामना करावा लागतो.

'सोशल मीडिया'वर या घटनेनंतर अनेकांनी स्वतःचे अनुभव शेअर केले. काही महिलांनी सांगितले, की काही आशियाई समाजांमध्ये वजनाबद्दल थेट आणि कधीकधी अत्यंत कठोर भाषेत बोलणे सामान्य मानले जाते. अनेकांना 'थोडं वजन कमी करा', 'तुम्ही जास्त जाड दिसता' किंवा 'हे तुमच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम करेल' अशा टिप्पणी ऐकाव्या लागतात. समाजाने हे इतके सामान्य केले आहे, की अनेकदा लोकांना त्यात काही चुकीचे वाटतही नाही; पण प्रत्यक्षात अशा टिप्पणी व्यक्तीच्या आत्मविश्वासावर गंभीर परिणाम करू शकतात. 'बॉडी शेमिंग' हा केवळ विनोद किंवा साधी टीका नसतो. तो मानसिक आरोग्यावर खोल परिणाम करणारा अनुभव असू शकतो.



# सिंहासनावर बसा, भरपूर पैसे कमवा!

रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये तयार करण्यात आलेलं एक सिंहासन सध्या चर्चेचा विषय ठरलं आहे. हे सिंहासन २.५ इंच बुलेटप्रूफ जॅकेटपासून तयार करण्यात आलं आहे. या सिंहासनाचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे काचेच्या आत असणाऱ्या नोटा. या नोटा सुमारे एक लाख डॉलर्स म्हणजे सात कोटी रुपये किंमतीच्या असल्याचं बोललं जात आहे. या सिंहासनावर सर्वसामान्य बसू शकतात. 'एक्स १० मनी थ्रोन' या नावाने हे सिंहासन ओळखलं जाणार आहे. रशियन पॉपस्टार ॲलेक्सी सर्गियेंको आणि उद्योजक इगोर राइबाकोव यांनी हे सिंहासन तयार केलं आहे. आता हे पैशांचं सिंहासन तयार करण्यामागचा नेमका उद्देश काय, असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. या दोघांनी एका वेगळ्या उद्देशाने हे सिंहासन तयार केलं आहे. या सिंहासनावर बसल्यानंतर लोकांना पैशांचं महत्त्व कळेल आणि जास्तीत जास्त पैसे कमवण्याची प्रेरणा मिळेल, असं ॲलेक्सी आणि इगोरचं म्हणणं आहे. रशियातले लोक श्रीमंत व्हावेत, असं या दोघांना वाटतं. या सिंहासनावर बसल्यानंतर लोकांनी पैसे कमावण्याचा गांभिर्याने विचार करावा, अशी त्यांची अपेक्षा आहे.

# घोडी पळाली नवऱ्याला घेऊन!



लग्नाच्या हंगामात प्रत्येक वरात काहीतरी वेगळी असते. काही ठिकाणी नवरदेव हेलिकॉप्टरने येतो, तर काही फिल्मी शैलीत नाचतात. एक घटना मात्र थोडी वेगळीच आहे. नवरदेव घोडीवर बसला होता, बँड तालावर नाचत होते. घोडीदेखील संगीतावर हलकेच नाचत होती. पण नंतर उत्साहात एका खोडकर वऱ्हाडीन मोठा फटाका वाजवला. या मोठ्या वाजत होता, नातेवाइक नाचत होते आणि सर्व काही शाही शैलीत सुरू होते. तथापि नंतर असे काही घडले ज्याचा कोणी विचारही केला नसेल. सगळ्यांचा नाच सुरू असताना एक फटाका मोठ्या आवाजात फुटला आणि घोडी वरासह गर्दी असलेल्या वरातीतून धावत सुटली. यामुळे काही काळ वरातीत गोंधळ उडाला.

लग्नाची मिरवणूक पूर्णपणे शाही शैलीत सजवलेली होती. वर पारंपारिक पोशाखात घोडीवर स्वार होता आणि वऱ्हडी मंडळी बँडच्या आवाजाने घोडी खूप घाबरली आणि वराला घेऊन पळून गेली. घोडीचा वेग इतका होता की काही सेकंदात ती दिसेनाशी झाली. वराला खाली उतरण्याचीही संधी मिळाली नाही. काही लोकांनी धावत तिला पकडण्याचा प्रयत्न केला. पण घोडी फक्त धावत राहिली.

फटाक्यांच्या आवाजाने घोडी पळून गेली ही संपूर्ण घटना कोणीतरी मोबाईल कॅमेऱ्यात कैद केली. नंतर वर तिच्या पाठीवरून खाली पडला. घोडी मात्र हाती लागली नाही.

# जंगल कुठंही नाही, मात्र स्टेशनाच्या नावात जंगल!




भारतीय रेल्वेच्या बऱ्याच स्थानकांची नावे स्थानिक परंपरा, त्या ठिकाणची तीर्थक्षेत्रे, नद्या, पर्वत, ऐतिहासिक घटनांवरून ठेवण्यात आल्याचे दिसून येते; मात्र उत्तर प्रदेशातील एका रेल्वे स्थानकाच्या नावात चक्क जंगल उल्लेख दिसून येतो. या स्थानकाच्या नावातील जंगल शब्द पाहताच अनेकांच्या मनात दाट जंगल, वनराई आणि एखाद्या दुर्गम भागातील रेल्वे स्थानकाचे चित्र उभे राहते. प्रत्यक्षात, त्या स्थानकाच्या परिसरात नावाप्रमाणे जंगल कुठेच दिसत नाही.

गोरखपूर जिल्ह्यात वसलेले 'नकहा जंगल' हे स्थानक उत्तर प्रदेशातील महत्त्वाच्या रेल्वे मार्गांपैकी एका मार्गावर स्थित आहे. नकहा ही जुनी स्थानिक वस्ती असून त्या परिसरात पूर्वी मोठ्या प्रमाणावर दाट जंगल होते. त्यामुळे या भागातील रेल्वे स्थानकाला नकहा जंगल अशी ओळख मिळाल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगितले जाते. उत्तर प्रदेशातील तराई पट्टा हा नेपाळ सीमेलगतचा भाग असून तो पूर्वी मोठ्या प्रमाणावर जंगलांनी व्यापलेला होता. येथील सुपीक जमीन, नद्या, ओलसर हवामान आणि दाट वनराई यामुळे हा प्रदेश नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध मानला जात होता. अनेक दशकांपूर्वी या भागात वन्य जीवांचाही वावर मोठ्या प्रमाणावर असल्याच्या कथा स्थानिकांमध्ये आजही सांगितल्या जातात. नकहा जंगल हे स्थानक ईशान्य रेल्वेच्या अखत्यारीतील स्थानक असून स्थानिक आणि उपनगरी प्रवासी वाहतुकीसाठी महत्त्वपूर्ण केंद्र मानले जाते. गोरखपूर हे उत्तर भारतातील एक महत्त्वाचे रेल्वे जंक्शन असल्याने या मार्गावरील अनेक प्रवाशांसाठी नकहा जंगल हे स्थानक दैनंदिन प्रवासाचा महत्त्वाचा भाग बनले आहे. गोरखपूर, गोंडा, नौतनवा तसेच आसपासच्या ग्रामीण आणि उपनगरी भागातील हजारो प्रवासी रोज या स्थानकाचा वापर करतात. विशेषतः विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी, शेतकरी आणि छोट्या व्यावसायिकांसाठी हे स्थानक अत्यंत उपयुक्त ठरते. ग्रामीण भागातून शहरात शिक्षण, नोकरी, व्यवसाय किंवा आरोग्य सेवांसाठी जाणाऱ्या नागरिकांना या स्थानकामुळे मोठी सुविधा मिळते. रेल्वे प्रवास हा तुलनेने स्वस्त आणि सोयीचा पर्याय असल्याने अनेक नागरिक आजही या स्थानकावर अवलंबून आहेत. रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, नकहा जंगल स्थानकावरून विविध पॅसेंजर आणि स्थानिक गाड्यांची वाहतूक सुरू असते. काही गाड्या गोरखपूरमार्गे पुढे बिहार आणि नेपाळ सीमेच्या दिशेनेही धावतात. त्यामुळे नकहा जंगल हे स्थानक केवळ स्थानिक वाहतुकीपुरते मर्यादित नसून प्रादेशिक संपर्कासाठीही महत्त्वाची भूमिका बजावते. ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या शहरांशी जोडण्यात या स्थानकाचा मोठा वाटा आहे.

# चहाबाज घोडा



चहा म्हणजे अनेकांसाठी जीव की प्राण. गरमागरम वाफाळता चहा समोर आल्याशिवाय अनेकांच्या दिवसाची सुरूवात होत नाही. या जगात चहाबाज माणसांची कमतरता नाही. पण लंडनमधल्या मर्सीसाइड पोलिसांच्या ताफ्यातला एक घोडा कमलीचा चहाबाज आहे. या घोड्याला चहाचं व्यसनच जडलं आहे, असं म्हटल्यास वावगं ठरू नये. जॅक नावाचा हा घोडा २० वर्षांचा आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून तो नियमितपणे चहा पितो. जॅकला सकाळी तबेल्यातच चहा लागतो. चहा प्यायल्याशिवाय त्याला तरतरी येत नाही. जॅकच्या दिवसाची सुरूवातही होत नाही. चहा प्यायल्याशिवाय तो कामाला जात नाही. जॅक पुढच्या वर्षी निवृत्त होणार आहे. पाच वर्षांचा असल्यापासून जॅक चहा पितो. मालकाच्या कपमधला उरलेला चहा चाटायची सवय त्याला लागली होती. मग या चहाने त्याला वेडंच करून टाकलं. ही सवय आता त्याच्या अंगात भिनली आहे. जॅक जीभ कपात बुडवून चहा पितो. मर्सीसाइड पोलीसही त्याला नियमित चहा देतात. जॅकचे सगळे लाड पुरवतात. जॅकचे चोचले अजिबात कमी नाहीत. त्याला गरम किंवा सायीचा चहा चालत नाही. पूर्ण दुधाचा एक चमचा साखर आणि थोडं थंड पाणी घातलेला चहा त्याला आवडतो. पण चहात जास्त साखर असेल तर तो खूप खूश होतो. चहा पिणाऱ्या जॅकचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्याच्या या व्हिडिओला दोन लाख रुपयांपेक्षा जास्त लाईक्स मिळाले आहेत.

# ...आणि तिचं स्वप्नं पूर्ण झालं

प्रत्येक माणसाचं काही ना काही स्वप्न असतं. कोणाला घर घ्यायचं असं तर कोणाला गाडी खरेदी करायची असते. कोणी जगभ्रमंतीची स्वप्नं रंगवत असतं. आता ही स्वप्नं पूर्ण करायची तर गाठीला पैसे हवेत. पैशांची जमवाजमव करण्यासाठी लोक बरीच मेहनत करतात. विविध मार्गांनी खर्चात कपात केली जाते आणि अखेरीस हे स्वप्न पूर्ण होतं. हे स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद वेगळाच असतो. अमेरिकेतल्या टेक्सासमध्ये रहाणारी एड्रिना एडवर्ड्स 'डेनीस' रेस्टॉरंटमध्ये वेटरचं काम करते. एड्रिनाला गाडी घ्यायची होती. गाडी घेता यावी म्हणून ती कार्यस्थळी चालत जात असे. एड्रिनाच्या कामाचं ठिकाण तिच्या घरापासून जवळ नव्हतं. एड्रिनाला तब्बल २२ किलोमीटर अंतर कापावं लागायचं. रेस्टॉरंटमधून घरीही ती पायीच यायची. एड्रिना जवळपास पाच तास चालायची. या रेस्ट्रॉरंटमध्ये आलेल्या एका जोडप्याला एड्रिनाबद्दल कळलं. त्यांनी एड्रिनाचं स्वप्न पूर्ण करायचं ठरवलं. हे जोडपं रात्री पुन्हा आलं. त्यावेळी त्यांच्या हातात नव्या कोऱ्या गाडीची चावी होती. त्यांनी ही गाडी एड्रिनाला दिली. गाडी बघून एड्रिना खूप खूश झाली. पाश्चात्य देशांमध्ये 'थँक्स गिव्हिंग'ची परंपरा आहे. यानिमित्ताने आपल्याला गाडी देण्यात आल्याचं एड्रिनाला वाटलं. या गाडीचे पैसे द्यायचे असतील तर गरजवंतांची मदत कर, असंही या जोडप्याने एड्रिनाला सांगितलं. या नव्या गाडीमुळे एड्रिनाचे कष्ट कमी होणार आहेत.



# रूग्णांचा आजार बरा करणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्याचे मंदिर

**उद्योजक अभय पारख यांचे प्रतिपादन; कान नाक घसा शिबीरास रुग्णांचा प्रतिसाद**

नगर – ज्याप्रमाणे माणूस मंदिरात गेल्यानंतर आपले सर्व दु:ख विसरतो त्याप्रमाणेच या आरोग्य मंदिरात रुग्णांना त्याचा प्रत्यय येत आहे. हॉस्पिटलमध्ये मिळणाऱ्या सोयी–सुविधा व मानसिक आधारामुळे रूग्णांचा आजार लवकर बरा होतो, त्यामुळे आज आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्याचे मंदिर झाले आहे. सातत्याने रुग्णांचा मोठा विश्वास या हॉस्पिटलवर वाढत आहे. दुसर्योला मदत करण्याची इच्छा असणे व मदत करणे यात फरक आहे आणि मदत करण्याचे काम आनंदऋषीजी हॉस्पिटल करत आहे, असे प्रतिपादन कॅमल साबुदाणा नगरचे वितरक अभय पारख यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड हार्ड सर्जरी सेंटरमध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त सौ. इंदुमती अशोक पारख (कॅमल साबुदाणा नगर) व परिवार प्रायोजित कान नाक घसा शिबीराचे उद्घाटन अभय पारख यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी अतुल पारख, संतोष बोथरा,माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ.वसंत कटारिया, प्रकाश छल्लानी, डॉ.अतुल तुपे, डॉ.सुकेशिनी गाडेकर, ऑडिओमैटी डॉ.सुरज कर्डीले आदि उपस्थित होते.

याप्रसंगी अतुल पारख म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना मिळत असलेल्या सेवेत विश्वामसार्हता आहे. त्यामुळे हे हॉस्पिटल गरीब – गरजु रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत आहे. ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्यावतीने होत आहे. या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा. फेडरेशन करत असलेल्या या मानवसेवेच्या कार्यात आमचाही खारीचा वाटा आहे यापुढेही आमचे नेहमीच सहकार्य राहील, असे सांगितले.



श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित कान, नाक, घसा शिबीराचे उद्घाटन करताना अभय पारख. समवेत अतुल पारख, संतोष बोथरा, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ.वसंत कटारिया, प्रकाश छल्लानी, डॉ.अतुल तुपे, डॉ.सुकेशिनी गाडेकर, डॉ.सुरज कर्डीले. (छाया – उदय जोशी)

संतोष बोथरा म्हणाले, आम्ही राबवत असलेल्या या शिबीराच्या माध्यमातून दानशूरांच्या पाठींब्यामुळे एक प्रेरणा मिळते. आणि नव्या उमेदीने शिबीरे घेण्यास म दत होते. पारख परिवाराचे काम मोलाचे आहे. या आरोग्य मंदिरात होणाऱ्या शिबिरांमुळे गरीब व गरजु रुग्णांना जो लाभ मिळतो, त्यांचे मोठ समाधान आम्हाला मिळत आहे. रुग्णसेवेत सातत्याने भर पडत आहे, अत्याधुनिक मशिनरीद्वारे उपचार करुन रुग्णांना दिलासा देण्याचे काम सुरु आहे.

याप्रसंगी डॉ.अतुल सुपे म्हणाले, हॉस्पिटलमध्ये कान नाक घसा यासाठी लागणारे सर्व आधुनिक मशिनरी, सर्वोत्तम आयसीयु सेंटर, एच.डी. कॅमेरा, मॉनेटर असून पेशंटची योग्य प्रकारे काळजी घेतली जाते, कानातून पाणी येणे, ऐकू कमी येणे कान, नाक,घसाच्या सर्व शस्त्रक्रिया दुबिणीव्दारे सवलतीच्या दरात केल्या जातात असे सांगितले.

या शिबीरात ९० रुग्णांची तज्ञ डॉक्टरांनी तपासणी करुन मार्गदर्शन केले.

यावेळी जैन सोशल फेडरेशनतर्फे मान्यवरांचा सत्कार करुन आभार मानले.



## गुरुवाणी – १७
## गुरूदेवांचे कर्म बंध

तुम्ही कधी विचार केला की असे घर बनवायचे ते पुढच्या सात पिढ्यांना उपयोगी येईल. नाही, हे अशक्य आहे. पण कुतुबमिनार, शंकेश्वर पार्श्वनाथ मंदिर अशा कितीतरी वास्तू पिढ्यानपिढ्या कायम आहेत. अशा वास्तू उभारण्याचा विचार आपण का नाही करत? हा विषय घर, महाल बांधण्याचा नाही तर हा विषय ९ तत्वांपैकी एका तत्वाचा म्हणजे बंध तत्वाचा आहे. आपल्याला शिकवले जाते की आपले पुण्य आपल्यासाठीच. आपले पाप, पुण्य इतरांना देऊ शकत नाही. पण तीर्थंकर परमात्मांची शिकवण आहे की, आपण कर्म बांधले तर ते इतरांना फळ देते. तीर्थंकरांनी जे घर बांधले ते २१ हजार वर्षांपासून कायम आहे. त्यांनी कर्म बांधले त्याचे फळ आपल्याला मिळत आहे. गुरूदेवांनीही असेच पुण्य कर्म बांधले त्याचे फळ आपल्याला मिळत आहे. हे जैनिझमचे कर्म बंध आहे. आज तपस्या होतेय ती फक्त गुरूदेवांचे पुण्य असल्यामुळे. तेच तपस्वींना ऊर्जा देत आहेत. विश्वातील प्रत्येक जीवाप्रती वात्सल्य भाव हे तीर्थंकरांचे बंध आहे. 'देने वाला सुख देता और लेने वाले को दुःख महसूस होता है, उसको 'मोह' कहते हैं'. 'देने वाला पिडा देता है और झेलने वाले को आनंद की अनुभूती होती है उसे 'वात्सल्य' कहते हैं'. मूल जन्माला येताना आईला प्रचंड प्रसूती वेदना होतात पण आई दुःखी न होता आनंदी होते, हे वात्सल्य असते. वात्सल्याचा आपल्यावर निरंतर वर्षाव करणाऱ्या गुरूदेवांचा जन्मोत्सव आपण साजरा करत आहोत. आचार्यश्रींच्या पवित्र भूमीत लहान मुलं अठ्ठाई उपवास करत आहेत हे अद्भुत आहे. गुरूदेवांनी असे पुण्य कर्म बांधले की त्यांच्या जन्मदिनानिमित्त इतके लोक अठ्ठाई उपवास आनंदाने करत आहेत. जे मुलं आज तपस्या करत आहेत ते 'अर्हम विज्ञा बेबी' आहेत. त्यांना गर्भात असतानाच गुरूदेवांचे संस्कार मिळालेत. सर्व तपस्वी उपवासाला गुरूदेवांची कृपा मानतात. गुरूदेवांनी श्रमण संघ बांधला, धार्मिक परीक्षा बोर्ड उभा केला. हे गुरूदेवांचे कर्म आहे. त्याचे श्रेय कोणीही घेऊ शकत नाही. स्वतःला भाग्यवान समजा की त्यांच्या पुण्याईचे फळ आपल्याला मिळत आहे.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त एचआयव्ही एड्स जनजागृती रॅली

नगर – आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त १२ ऑगस्ट रोजी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय यांच्यावतीने शहरात एचआयव्ही एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीच्या मुख्य कार्यक्रमास जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. संतोष विधाते, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुचिता यादव, पॅथॉलॉजिस्ट डॉ. नागेश महामुनी, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सोमय्या खान, अधिसेविका ज्योती लोंढे, परिचारिका ज्योती कडू पाटील, आशा दुबे, श्रुतिका धामोरे, भाग्यश्री भुजाडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव यांच्या उपस्थितीत पार पडला.

एचआयव्ही संसर्ग रोखण्यासाठी युवकांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. प्रत्येक युवकाने एचआयव्ही एड्स बाबत सविस्तर माहिती प्राप्त केल्यास भविष्यात त्यांच्यापर्यंत एचआयव्ही संसर्ग येणार नाही, त्याचप्रमाणे प्रत्येक युवकाने एचआयव्ही बाबतची माहिती इतर सहकाऱ्यांना, समाजातील व्यक्तींना दिल्यास मोठ्या प्रमाणावर जनजागृती होऊन एच आय व्ही ची रोखथांब होण्यास मदत होईल.

प्रास्ताविकमध्ये शिवाजी जाधव यांनी जिल्ह्याची एचआयव्हीबाबत सद्यस्थिती संसर्गाचे मार्ग प्रतिबंधात्मक उपाय व युवकांची भूमिका व जिल्हा एड्स नियंत्रण विभाग यांच्यामार्फत घेत असलेले परिश्रम याबाबतची माहिती दिली. सूत्रसंचालन नवनाथ लोखंडे यांनी केले. आभार राधाकिसन पाटोळे यांनी मानले.



आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त १२ ऑगस्ट रोजी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय यांच्यावतीने शहरात एचआयव्ही एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली.

या जनजागृती रॅलीमध्ये भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल, महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर, न्यू आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज, न्यू लॉ कॉलेज, जिल्हा नर्सिंग विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी बॅनर व घोषवाक्य फलक हातात घेवून सहभाग घेतला होता.

रॅलीच्या सुरुवातीला न्यू आर्ट्स कॉमर्स सायन्स महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नृत्य व संगीत याद्वारे कलंक व भेदभाव संदर्भातील संदेश दिला. रॅलीचा समारोप जिल्हा आयुष्य रुग्णालय या ठिकाणी करण्यात आला. कार्यक्रमासाठी सागर फुलारी, रोहन भांबळ, वैशाली कुलकर्णी, सविता बेलेकर, शर्मिला मस्के, राहुल कडूस, विनय इदे, राहुल खैरनार, प्रवीण देठे, दिनेश लोंढे तसेच स्नेहज्योत प्रकल्प व अमृतदीप प्रकल्प कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कोहिनूर मॉलमधील ई कचरा संकलन केंद्राचे १३ ऑगस्टला होणार उद्घाटन

नगर – बंद पडलेले व वापरत नसलेल्या इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिकल उपकरणे या ई कचऱ्याची प्रदूषण न होता योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी नगर शहरात विचार भारती काम करत आहे. गेल्या ६ महिन्यांपूर्वी झालेल्या ई कचरा संकलन उपक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. आता या ई कचऱ्याचे कायम स्वरूपी संकलन करण्यासाठी सावेडीच्या कोहिनूर मॉलमध्ये विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता या ई कचरा संकलन केंद्राचे उद्घाटन उद्योजक अश्विन गांधी व महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते होणार आहे.

तसेच फेब्रुवारी महिन्यात झालेल्या ई कचरा संकलन उपक्रमात जमा झालेल्या संगणकांची उत्तमरीत्या दुरुस्ती करून वापरण्याजोगे करण्यात आली आहेत. अशा १० संगणकांचे वितरणही या कार्यक्रमात गरजू शाळांना करण्यात येणार आहे, अशी माहिती ई कचरा संकलन उपक्रमाचे समन्वयक उदय भणगे यांनी दिली.

विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे यांनी सांगितले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त हा ई कचरा संकलन उपक्रम पुण्याच्या पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशन, विचार भारती, सेवा भारती व कोहिनूर मॉल यांच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. सावेडीच्या कोहिनूर मॉल येथे कायमस्वरूपी हे ई कचरा संकलन सुरु राहणर असून नागरिकांनी कामकाजाच्या वेळेत येथे आपल्या घरातील वापरत नसलेले इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिकल उपकरणांचा ई कचरा येथे जमा करावा. यामध्ये बंद पडलेले कॉम्प्युटर्स, लॅपटॉप आणि त्याचे पार्टस्, प्रिंटर, मॉनिटर, मोबाईल्स, चार्जर, बॅटरी, टिव्ही, फ्रीज, एसी, वॉशिंग मशीन, मायक्रोवेव्ह, मिक्सर, फॅन, कॅमेरा, हेड फोन्स्, स्पिकर, सीडी–डीव्हीडी प्लेयर आशा बंद पडलेल्या वासू द्याव्यात, असे आवाहन केले.

# प्रा. कुंदा हळबे यांना ७५ व्या वर्षी पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी

नगर – प. पू. डॉ. हेडगेवार शैक्षणिक संकुल, विद्या प्रतिष्ठान महाराष्ट्र संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय व संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थी प्रा. कुंदा हळबे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी १० ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आली. वयाच्या ७५व्या वर्षी पीएच.डी. पदवी संपादन करून प्रा. हळबे यांनी विद्यार्थ्यांसह सर्वांसमोर शिक्षणाची अखंड साधना आणि जिद्दीचे प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.



प्रा. कुंदा हळबे यांनी इंग्लिश मीडियम स्कूल, डी.एड. कॉलेज तसेच विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्राचार्य म्हणून प्रदीर्घ काळ कार्य केले आहे. सेवानिवृत्तीनंतर जवळपास पंधरा वर्षांनी त्यांनी पीएच.डी. संशोधन कार्यास सुरुवात केली. वयाच्या ७५व्या वर्षी पीएच.डी.चे संशोधन कार्य पूर्ण करणे ही त्यांच्या जिद्दीची, चिकाटीची आणि कठोर परिश्रमाची प्रेरणादायी कहाणी आहे.

प्रा. हळबे यांनी आपल्या पीएच.डी.च्या संशोधन कार्याची सुरुवात डॉ. आश्लेषा भंडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली केली. त्यानंतर माजी प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे यांच्या मार्गदर्शनाने संशोधन कार्य पुढे नेले. पुढे डॉ. अविनाश भांडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण केले. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माननीय दादाराम ढवाण, कार्यवाह माननीय सोमनाथ दिघे, सहकार्यवाह तथा माजी प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे, सर्व संस्थाचालक, प्राचार्य डॉ. शिवाजी देसाई, सर्व प्राध्यापक, सहकारी तसेच समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांनी प्रा. कुंदा हळबे यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सौ. आशाबाई गुंदेचा यांच्या ८ दिवस उपवासाची पचकावणी



नगर – विनायकनगर येथील रहिवासी कांतीलाल गुंदेचा यांच्या धर्मपत्नी सौ. आशाबाई गुंदेचा यांच्या ८ दिवस उपवासाची पचकावणी १३ ऑगस्ट रोजी होणार आहे.

महाराष्ट्र प्रवर्तक प.पू. कुंदनऋषीजी म.सा. तथा अलोकऋषीजी म.सा., उपाध्याय प्रविणऋषीजी म.सा. तथा प.पू तिर्थेशऋषीजी म.सा. यांच्या सान्निध्यान आनंदधाम येथे होणाऱ्या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन गुंदेचा परिवाराने केले आहे.

# ज्येष्ठ वास्तुविशारद किरण कांकरिया यांना जीवनगौरव पुरस्कार

**वास्तुशास्त्र क्षेत्रातील चार दशकांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव**

नगर – वास्तुशास्त्र क्षेत्रात गेली चार दशके उल्लेखनीय कार्य करणारे ज्येष्ठ वास्तुविशारद आर्किटेक्ट किरण के. कांकरिया यांना वास्तुशास्त्र क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट आणि दीर्घकालीन योगदानाबद्दल प्रतिष्ठित जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन ऑफ अहिल्यानगर यांच्या वतीने हॉटेल संजोग, अहिल्यानगर येथे आयोजित विशेष समारंभात असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष इंजि. अभिजित देवी यांच्या हस्ते आर्किटेक्ट किरण कांकरिया यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष इंजि. तांदळे, सचिव इंजि. भूषण पांडव तसेच नवनिर्वाचित सदस्य इंजि. सचिन डागा आणि इतर सर्व सभासद उपस्थित होते.

या गौरवपूर्ण प्रसंगी सौ. ज्योती आणि गौरव कांकरिया यांचीही उपस्थिती होती. त्यांनी आर्किटेक्ट किरण कांकरिया यांच्यासोबत हा आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण अनुभवला.

आर्किटेक्ट किरण कांकरिया यांनी आपल्या सुमारे ४० वर्षांच्या प्रदीर्घ व्यावसायिक कारकिर्दीत वास्तुशास्त्र क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये अनेक प्रतिष्ठित संस्था, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, प्रशासकीय इमारती तसेच सार्वजनिक आणि खासगी प्रकल्पांच्या वास्तु नियोजन व विकासामध्ये त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे.



ज्येष्ठ वास्तुविशारद किरण कांकरिया जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करताना आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनचे अध्यक्ष इंजि. अभिजित देवी व मान्यवर.

शैक्षणिक क्षेत्रातही आर्किटेक्ट कांकरिया यांची उल्लेखनीय कामगिरी असून ते बी.आर्क.मध्ये प्रथम क्रमांकाचे मानकरी आणि सुवर्णपदक विजेते आहेत. आपल्या प्रदीर्घ व्यावसायिक प्रवासात त्यांनी वास्तुशास्त्रातील सर्जनशीलता, तांत्रिक कौशल्य आणि सामाजिक दृष्टिकोन यांचा सुंदर समन्वय साधत अनेक महत्त्वपूर्ण वास्तू साकारल्या आहेत.

त्यांच्या उत्कृष्ट वास्तुशिल्पीय कार्याची दखल घेत त्यांना यापूर्वीही अनेक बेस्ट आर्किटेक्ट पुरस्कार तसेच बिरला एईएसए पुरस्कार प्राप्त झाले आहेत. शिर्डी डेव्हलपमेंट, आनंदऋषिजी हॉस्पिटल, लोकमत प्रशासकीय इमारत, जालना तपोधन प्रकल्प, मोक्षधाम, विविध कृषी महाविद्यालयांचे कॅम्पस तसेच लातूर येथील ७५० आसनांचे सभागृह यांसह अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांसाठी त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

वास्तुशास्त्र क्षेत्रातील चार दशकांची समर्पित सेवा, उल्लेखनीय उपलब्धी, व्यावसायिक उत्कृष्टता आणि वास्तुशास्त्राच्या विकासासाठी दिलेल्या दीर्घकालीन योगदानाचा गौरव म्हणून हा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान स्वीकारताना आर्किटेक्ट किरण कांकरिया यांनी आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन ऑफ अहिल्यानगर, असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, सहकारी वास्तुविशारद व अभियंते, विविध संस्था, ग्राहक, कुटुंबीय व आपल्या व्यावसायिक प्रवासात साथ देणाऱ्या हितचिंतकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आर्किटेक्ट किरण कांकरिया यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी आणि बांधकाम क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. चार दशकांच्या त्यांच्या यशस्वी आणि गौरवपूर्ण वास्तुशास्त्रीय प्रवासाचा हा सन्मान म्हणजे त्यांच्या कार्याला मिळालेली विशेष पावती आहे.



पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आय.एम.एस.सी.डी.आर.मध्ये त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# आय.एम.एस.सी.डी.आर. येथे ग्रंथपाल दिन साजरा

नगर – भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आय.एम.एस.सी.डी. आर.च्या लर्निंग रिसोर्स सेंटरतर्फे ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आय.एम.एस.चे लर्निंग रिसोर्स सेंटर हे शिक्षणाला चालना देणे, शैक्षणिक समुदायाला आवश्यक माहिती व संसाधने उपलब्ध करून देणे आणि वाचक–केंद्रित सेवा विकसित करणे यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या आधुनिक साधनांचा प्रभावी वापर करून ग्रंथालयाने आपल्या सेवांची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि वाचकांचे समाधान वाढविण्यावर सातत्याने भर दिला आहे.

१२ ऑगस्ट १८९२ रोजी शियाली, मद्रास येथे जन्मलेल्या डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी भारतातील ग्रंथालय विज्ञानाच्या विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांनी मांडलेले ग्रंथालय विज्ञानाचे पाच नियम आजही ग्रंथालय व्यवस्थापन, माहितीसेवा आणि वाचक–केंद्रित सेवांसाठी मार्गदर्शक ठरतात.

या प्रसंगी आय.एम.एस.च्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे यांच्या हस्ते, विशिष्ट सल्लागार डॉ. एम. बी. मेहता आणि उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांच्या उपस्थितीत भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

ग्रंथालय कर्मचारी धनराज घोडके यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमास विभागप्रमुख डॉ. हातिम कयुमी, डॉ. महेश पोद्दार, कार्यालय अधीक्षक श्री. महेश दीक्षित, लेखापाल श्री. नरेंद्र कदम, ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस, प्रशासकीय कर्मचारी तसेच ग्रंथालय कर्मचारी श्री. जितीन आ ढाव, श्री. सिराज मुलाणी, श्री. राजेश कांबळे आणि सौ. रजिया शेख आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतातील ग्रंथालय विज्ञानाच्या विकासासाठी डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी केलेल्या अग्रगण्य कार्याला आदरांजली अर्पण करण्याबरोबरच, ज्ञाननिर्मिती, संशोधन, शिक्षण आणि समाजाच्या बौद्धिक विकासात ग्रंथालयांची असलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करण्यात आली.

# संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त माळीवाड्यात शोभायात्रा

नगर – श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथे श्री विशाल गणेश मंदिर देवस्थान व उत्सव समितीच्या वतीने शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेचा प्रारंभ माळीवाडा येथील शहराचे ग्रामदैवत विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते श्री संत सावता महाराज यांच्या रथातील तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला.

कार्यक्रमास देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उत्सव समितीचे प्रमुख छबू नाना जाधव, माजी महापौर भगवान फुलसुंदर, ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम, दत्ता गाडळकर, सुवर्णा जाधव, मंगलताई लोखंडे, पंडितराव खरपुडे, पांडुरंग नन्नवरे, सुरेखा कदम, दत्ता जाधव, विष्णुपंत म्हस्के, बजरंग भुतारे, ज्ञानेश्वर रासकर, संजय चाफे, माणिकराव विधाते, रंगनाथ फुलसौंदर, विजय कोथिंबिरे, चंद्रकांत फुलारी, नितीन शेरकर, नितीन पुंड, सुभाष राऊत, परेश लोखंडे, बाळासाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, जालिंदर महाराज निकम, जालिंदर बोरुडे, कैलास खरपुडे आदी उपस्थित होते.



श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथून शोभायात्रा काढण्यात आली.

या शोभायात्रेत महिलांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. अनेक महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून डोक्यावर कलश घेऊन सहभाग नोंदवला. तसेच आळंदी येथून आलेल्या बाल वारकऱ्यांनी टाळ–मृदुंगाच्या गजरात भक्तिगीतांवर सादरीकरण करत संपूर्ण शोभायात्रेला अध्यात्मिक रंगत दिली.

माळीवाडा येथील श्री विशाल गणपती मंदिराचा रथही शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरला. या रथामध्ये संत सावता महाराज यांचे तैलचित्र आकर्षक फुलांच्या सजावटीसह विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ही शोभायात्रा माळीवाडा वेशीपासून सुरू होऊन फुलसुंदर चौक, ब्राह्मण गल्ली, बारातोटी कारंजा, इवळे गल्ली, कौटीची तालीम चौक, ढोर गल्ली मार्गे पुन्हा माळीवाडा चौकात विसर्जित झाली. संपूर्ण मार्गावर नागरिकांनी रथावर पुष्पवृष्टी करत उत्सवाचे स्वागत केले. या धार्मिक शोभायात्रेने परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. संत सावता महाराज यांच्या कार्याचे स्मरण करून समाजात एकतेचा आणि सेवाभावी विचार रुजवण्याचा संदेश या शोभायात्रेतून देण्यात आला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

